# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**गुरुवार, दिनांक २१ डिसेंबर, २०१७ / अग्रहायण ३०, १९३९ ( शके )**

**(१) वित्त व नियोजन, वने मंत्री**
**(२) ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री**
**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**
**(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री**
**(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७२**

---

## लातूर जिल्ह्यातील तावरजा मध्यम प्रकल्पातून होत असलेल्या पाणी गळतीबाबत

**(१) * १०२४१९ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण)** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील तावरजा मध्यम प्रकल्पाचे गेट नादुरुस्त झाले असून सांडव्यास भेगा गेल्याने प्रकल्पातील पाणी वाहून जात असल्यामुळे सदर गेट व सांडव्याची दुरुस्ती करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत दोन वर्षापासून मा.मुख्यमंत्री, मा.पालकमंत्री व संबधित अधिकारी यांच्याकडे सातत्याने मागणी करूनही तसेच मा.जलसंपदा मंत्री यांनी लातूर येथे घेतलेल्या आढावा बैठकीत आदेश देऊनही आतापर्यंत सदर दुरुस्ती करण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची चौकशी शासनाने केली आहे काय, त्यानुसार उक्त प्रकल्पाच्या सांडवा व गेटची दुरुस्ती करण्यासह दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, सदर विषयाचे दिनांक २६.०७.२०१७ चे निवेदन प्राप्त आहे.
(२) मा.जलसंपदा मंत्री यांनी दि.२.६.२०१६ रोजी लातूर येथे झालेल्या आढावा बैठकीत यासंदर्भात आदेश दिले आहे.
(३) व (४) गळती थांबविण्यासाठी कायमस्वरुपी उपाय योजना सूचविण्याबाबत अधीक्षक अभियंता (दरवाजे) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांना गेट संकल्पन करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. सदर संकल्पन प्राप्त झाल्यानंतर दुरुस्तीची कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्हयातील ट्रॉमा केअर सेंटर कार्यान्वित करण्यासह जिल्हा व उपजिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२) * १०३१५१ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्हयात माकडताप, लेप्टो व डेंग्यू या रोगांमुळे रूग्णांच्या संख्येत वाढ होत असताना जिल्ह्यात जिल्हा रुग्णालय, कणकवली व सावंतवाडी उपजिल्हा रुग्णालयातील एकूण मंजूर पदांपैकी ४०८ वैद्यकीय पदे रिक्त असून जिल्हा रूग्णालयातील १२९ रिक्त पदांपैकी वैद्यकीय अधिकाऱ्यांची ७० पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्हयातील रूग्णांना गोवा, कोल्हापूर, बेळगाव आणि मुंबईच्या रूग्णालयांवर वैद्यकीय उपचारासाठी अवलंबून रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत यापूर्वी अभिनव फॉऊंडेशनने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असता त्यावरील सुनावणीच्या वेळी शासनाने सावंतवाडी व कणकवली या उपजिल्हा रूग्णालयासह मौजे तरळे येथे ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याची हमी न्यायालयात देऊन १० वर्षे झालेली असतानाही सदरहू ट्रॉमा केअर सेंटर आजमितीस कार्यान्वित झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्हयातील ट्रॉमा केअर सेंटर कार्यान्वित करण्यासह जिल्हा व उपजिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात यावर्षी माकडताप आणि लेप्टो या आजारांच्या रुग्णांमध्ये वाढ झालेली असून डेंग्यू रुग्णामध्ये घट झालेली आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात जिल्हा रुग्णालयासह असलेल्या एकूण ११ रुग्णालयामध्ये ८३२ पदे मंजूर असून त्यापैकी ५४८ पदे भरलेली आहेत. जिल्हा रुग्णालयातील १३० रिक्त पदांपैकी वैद्यकीय अधिकाऱ्यांची २३ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

काही गंभीर रुग्णांना विशेषज्ञांच्या सेवेकरिता कोल्हापूर, गोवा, मुंबई येथे संदर्भित करण्यात येत असले तरी इतर रुग्णांना जिल्हयातील आरोग्य यंत्रणेमार्फत विशेषज्ञांकडून उपचार देण्यात येतात.

(३) हे अंशत: खरे आहे.

सावंतवाडी आणि कणकवली येथील ट्रॉमाकेअर सेंटर बांधून तयार असून मनुष्यबळासही मान्यता मिळालेली आहे. पदभरती आणि साधनसामुग्री उपलब्ध होताच ती कार्यान्वित होतील.

तरळे येथील ट्रॉमाकेअर सेंटर साठी जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी आणि कणकवली येथील ट्रॉमा केअर सेंटर साठी मनुष्यबळ मंजूर झाले असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

तसेच शासनाचे परिपत्रक दि. २६.१०.२०१६ अन्वये वैद्यकीय अधिकारी, गट-अ (ग्रेड पे रु.५४००) संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीमार्फत मुलाखतीद्वारे सिंधुदुर्ग जिल्हयात ८ पदे भरण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

तसेच शासन आदेश दि.७.१२.२०१७ नुसार जिल्हा रुग्णालय, सिंधुदुर्ग येथील २ पदे, उपजिल्हा रुग्णालय, सावंतवाडी येथील १ पद व तालुका आरोग्य अधिकारी, कणकवली येथील १ पद, उपजिल्हा रुग्णालय कणकवली येथील १ पद याप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकूण ५ वैद्यकीय अधिकारी (विशेषज्ञ) पदे भरण्यात आली आहेत.

तसेच गट-क ची रिक्त पदे भरण्यास उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ यांच्यास्तरावर अर्ज मागविण्यात आले आहेत. तसेच गट-ड मधील ६८ पदे भरण्यासाठी ऑगस्ट, २०१७ मध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात आली असून त्यापैकी ५३ उमेदवार हजर झाले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निगडे बु. (ता.वेल्हे, जि.पुणे) येथे पाझर तलाव फुटुन शेतीचे झालेले नुकसान

**(३) * ९७९५७ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निगडे बु. (ता.वेल्हे, जि.पुणे) येथील जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागाचा निकृष्ट दर्जाचा पाझर तलाव फुटुन सुमारे दीड कि.मी. अंतरापर्यंतची शेकडो एकर शेती वाहून गेली असल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाझर तलाव फुटुल्यामुळे बंधाऱ्याच्या खर्चासह पिके व शेतीचे सुमारे १० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन सदर निकृष्ट दर्जाचा तलाव बांधलेल्या ठेकेदारावर कारवाई करण्यासह नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे अशंत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) मौजे निगडे बु. ता.वेल्हे, जि.पुणे येथील पाझर तलाव फुटुन झालेल्या नुकसानीचे संयुक्त पंचनामे संबंधित महसुल यंत्रणेमार्फत करण्यात आलेले असून, त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांना सादर करण्यात आला आहे. संबंधित ठेकेदाराने सामाजिक बांधिलकीच्या नात्याने शेतीचे व बांधाचे झालेल्या नुकसानीची दुरुस्ती करुन देण्याबाबत अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.पुणे कार्यालयास लेखी कळविलेले असून त्याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्यात येत आहे. याबाबत संबंधित ठेकेदारास जबाबदार धरुन कामाचे देयक रोखण्यात आले आहे.

-----------------

## मालेगाव (जि.नाशिक) उपवन विभाग व सुरगाणा वनपरिक्षेत्राच्या हद्दीत झालेली वृक्षतोड

**(४) * ९५८२८ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) उपवन विभागाच्या हद्दीतील मालेगाव तालुक्यातील गाळणे, नागझरी, चिंचवे, शिंदवाडी, विराणे, पोहाणे, रामपुरा आदी भागातील २२५ हेक्टरवर असलेल्या जंगलामधील ४०० हून अधिक खैर प्रजातीच्या वृक्षांची इलेक्ट्रिक कटरद्वारे तोड करून लाकूड चोरी करण्यात आल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच गुजरातच्या सीमेवरुन महाराष्ट्रातील नाशिकच्या सुरगाणा वनपरिक्षेत्राच्या हद्दीत घुसखोरी करुन खैराची तस्करी केली जात असल्याचेही माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर वृक्षतोड करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) नाशिक वनवृत्तातील मालेगाव उप वन विभागातील मालेगाव वनक्षेत्रातील गाळणे परिमंडळातील गाळणे-१ नियतक्षेत्रात राखीव वन कक्ष क्र.४२४, ४२५ शिंदवाडी (नागझरी) येथे ३०६ खैर वृक्ष व विराणे परिमंडळातील चिंचवे नियतक्षेत्रातील मौजे पोहाणे राखीव वन क.नं.४२१ मध्ये खैर वृक्ष ६३ व निमवृक्ष-१ अशी एकूण ३७० वृक्षांची (घ.मी.१८.५६२) तोड झाल्याचे दिनांक १० ऑक्टोंबर, २०१७ रोजी निदर्शनास आलेले आहे.

(२) नाशिक वनवृत्तातील पूर्व नाशिक वन विभागातील सुरगाणा वनक्षेत्रात माहे एप्रिल २०१७ मध्ये खैर प्रजाती बाबत अवैध वाहतुकीची एक घटना निदर्शनास आली आहे. याबाबत प्रथम गुन्हा दिनांक १२/०४/२०१७ जारी केला आहे.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी आरोपी श्री.बाबुराव इस-या राऊत यांना दिनांक २६.१०.२०१७ रोजी अटक करून त्यांचेकडील वाहन महिंद्रा मॅक्स चौकशीकामी जप्त केले आहे. आरोपीस दि.२७/१०/२०१७ रोजी मे.ज्युडी.मॅजिस्टेट, मालेगांव यांचे कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने दिनांक ४.११.२०१७ पर्यंत फॉरेस्ट कोठडी दिली होती. तदनंतर दिनांक ५.११.२०१७ पासून आरोपीस न्यायालयीन कोठडी मंजूर करण्यात आली. चोरीस गेलेल्या मालापैकी खैर ३१० नग ३.४४० घ.मी. एवढा जप्त करून ताब्यात घेतलेला आहे. इतर ४ आरोपींचा व चोरीस गेलेल्या मालाचा शोध घेण्याचे काम चालू आहे. तसेच या प्रकरणी १ वनक्षेत्रपाल, २ वनपाल व ४ वनरक्षक यांना जबाबदार धरुन त्यांचे विरुध्द खात्यामार्फत विभागीय चौकशी सुरु करणेत आलेली आहे.

पुर्व नाशिक वन विभागातील सुरगाणा वनक्षेत्रात खैर वाहतूक प्रकरणी आरोपी श्री.गणेश मोतीराम वाघमारे यास दिनांक २३.८.२०१७ रोजी अटक करणेत येऊन दिनांक २.११.२०१७ रोजी त्यास जामीन मिळाला आहे. आरोपी श्री. प्रविणभाई किकुभाई पटेल रा.वापी (गुजरात) यांस दिनांक २८.८.२०१७ रोजी अटक करणेत येऊन दिनांक ३०.१०.२०१७ रोजी त्यास जामीन मिळाला आहे. आरोपी श्री.संताभाई दाजीभाई काळात रा.आरनाइ (गुजरात) यांस दि.३०.८.२०१७ रोजी अटक केली असुन तो मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दिंडोरी यांचे न्यायालयीन कोठडीत असून पुढील तपास सुरु आहे.

-----------------

## राज्यातील दमणगंगा-पिंजाळ व पार-तापी-नर्मदा नदीजोड प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(५) * ९६१८७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन व केंद्र शासनाच्या सहकार्याने राज्यातील दमणगंगा-पिंजाळ व पार-तापी-नर्मदा नदीजोड प्रकल्प पूर्ण करण्याबाबत माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या प्रकल्पाचे स्वरुप काय असून त्यासाठी किती खर्च येणार आहे,

(३) असल्यास, या प्रकल्पामुळे राज्यातील कोणकोणत्या भागांना सिंचनाचा उपयोग होणार असून किती सिंचन क्षमता वाढणार आहे,

(४) असल्यास, सदर दोन्ही प्रकल्प तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) दिनांक ३ मे, २०१० रोजी तत्कालीन मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, गुजरात व केंद्रीय जलसंसाधन मंत्री यांच्यामध्ये दमणगंगा-पिंजाळ व पार-तापी-नर्मदा या गुजरात व महाराष्ट्र राज्यातील आंतरराज्य नदीजोड योजनांच्या संदर्भात राष्ट्रीय जलविकास अभिकरणामार्फत (NWDA) सदर योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या अनुषंगाने सामंजस्य करार झालेला आहे.

(२) दमणगंगा-पिंजाळ योजनेद्वारे दमणगंगा खोऱ्यातील महाराष्ट्राच्या हद्दीतील महाराष्ट्राच्या वाट्याचे पाणी मुंबई शहराच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी वळविणे हा मुख्य उद्देश आहे. राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने तयार केलेल्या या योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार प्रकल्पाची किंमत रु. २७४६.६१ कोटी इतकी आहे.

(३) दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प हा मुंबई शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी तसेच पार-तापी-नर्मदा नदीजोड प्रकल्प नवसारी, सुरत, डांग, भरुच, सौराष्ट्र व कच्छ भागातील सिंचन व पिण्याच्या पाण्यासाठी नियोजित आहे.

(४) उपरोक्त प्रकल्पांची व्याप्ती, प्रकल्पांची किंमत व लाभ यांची विभागणी तसेच पाण्याच्या हिश्याच्या विभागणीबाबत दोन्ही राज्यांची सहमती झाल्यानंतर पुढील अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र शासन, गुजरात व केंन्द्र शासनासोबत सामंजस्य करार करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कळंब (ता.वसई, जि.पालघर) ग्रामपंचायतीत शौचालय प्रोत्साहन योजनेत झालेला गैरव्यवहार

**(६) * १०३५६५ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कळंब (ता.वसई, जि.पालघर) ग्रामपंचायतीत शौचालय प्रोत्साहन योजनेत प्रत्यक्ष शौचालयाचे अनुदान लाभार्थींना न देता लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार शौचालय प्रोत्साहन योजनेत गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय
(२) शासनाने चौकशी केली असून तत्कालीन ग्रामविकास अधिकाऱ्याने गैरव्यवहार केल्याचे आढळून आले आहे.
(३) दोषी असलेले तत्कालीन ग्रामविकास अधिकारी श्री.साहेबा डी. राठोड यांना जिल्हा परिषद सेवेतून निलंबीत करण्यात आले असून, त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चाळीसगांव (जि.जळगांव) तालुक्यातील नरभक्षक बिबट्याला जेरबंद करण्याबाबत

**(७) * १०३६०४ श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगांव (जि.जळगांव) तालुक्यातील उंबरखेडे, पिंपळगाव म्हाळसा, देशमुखवाडी व वरखेडे या गावातील दहा ते पंधरा कि.मी. परिसरात आतापर्यंत नरभक्षक बिबटयाच्या हल्ल्यात चार बळी गेल्याची बाब दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू घटना घडूनही नरभक्षक बिबटयाचा बंदोबस्त करण्यासाठी वन विभागाकडून कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन या भागातील नरभक्षक बिबट्याला जेरबंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) माहे जुलै, २०१७ ते दिनांक १५.११.२०१७ या कालावधीत चाळीसगांव (जि.जळगांव) तालुक्यातील उंबरखेड येथे २, देशमुखवाडी येथे १ व वरखेडे येथे १ असे एकूण ४ व्यक्तींचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यु झाला आहे.

(२) व (३) सदर परिसरात वारंवार होणारे बिबट्यांचे हल्ले पाहता आणखी मनुष्यहानी टाळण्याच्या अनुषंगाने मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी सदर नरभक्षक बिबट्यास पारध करण्याची परवानगी दिली आहे. त्या अनुषंगाने सदर बिबट्यास जेरबंद करणे/ बेशुध्द / पारध करणाऱ्या ५ पथकांची निर्मिती करण्यात आली होती. तसेच १० ट्रॅप कॅमेरे, ४ वाहन गस्ती पथके, ४ पायी गस्ती पथके लावण्यात आले असून सदर कामी १३० वन कर्मचारी तैनात करण्यात आले होते. दरम्यानच्या काळात दिनांक ०९.१२.२०१७ रोजी सदर नरभक्षक बिबट्यास पारध करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेळघाट (जि.अमरावती) आदिवासी गावात ब्रम्हसती धरण बांधण्याबाबत

**(८) * १०२४३४ श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (जि.अमरावती) येथील आदिवासी गावात उन्हाळ्याच्या दिवसात पिण्याचे शुद्ध पाणी मिळत नसल्याने आदिवासी गावांना मुबलक पिण्याचे पाणी मिळण्यासाठी ब्रम्हसती धरण बांधण्याबाबत अनेक वर्षापासून मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार मेळघाटातील आदिवासी गावात ब्रम्हसती धरण बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) मानचित्र अभ्यासानुसार १.८७ द. ल. घ. मी. पाणी ५०% विश्वासार्हतेने उपलब्ध होऊ शकेल परंतु सदर प्रकल्पाची किंमत रु. ६५.८२ कोटी एवढी असून प्रचलीत मापदंडात सदर योजना आर्थिक व तांत्रिक दृष्टया असफल आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मनोधैर्य योजनेच्या निकषात बदल केल्याबाबत

**(९) * ९५४९८ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बलात्कार व ॲसिड हल्ला झालेल्या महिला आणि लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या बालकांचे पुनर्वसन व त्यांना अर्थसहाय्य करण्यासाठी 'मनोधैर्य' योजनेच्या अर्थसहाय्य निकषात बदल करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन निकषांनुसार ओढवलेल्या घटनेचा परिणाम म्हणून महिला किंवा बालकांस कायमचे मतिमंदत्व अथवा अपंगत्व आल्यास, सामुहिक बलात्काराच्या प्रकरणांत गंभीर इजा झाल्यास किंवा ॲसिड हल्ल्यात चेहरा विद्रुप झाल्यास १० लाखांचे अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घटनेची पडताळणी करुन अर्थसहाय्य मंजूर करण्याचे अधिकार जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाला देण्यात आले असून दिनांक ३१ डिसेंबर, २००९ पासूनच्या पात्र प्रकरणांना पूर्वलक्षी प्रभावाने ही योजना लागू करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक ३१ डिसेंबर, २००९ च्या पूर्वलक्षी प्रभावापासून आतापर्यंत किती पात्र प्रकरणात हे अर्थसहाय्य प्रस्तावित करण्यात आले आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय.
(३) व (४) मनोधैर्य योजनेच्या दिनांक २१.१०.२०१३ च्या शासन निर्णयातील अर्थसहाय्याच्या निकषात बदल करुन महिला व बाल विकास विभागाच्या दिनांक ०१.०८.२०१७ च्या आदेशान्वये सुधारित मनोधैर्य योजना राज्यात कार्यरत आहे. तथापि, मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.८७/२०१७ या न्यायप्रकरणात मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार सदर सुधारित मनोधैर्य योजनेच्या निकषात बदल करण्यासाठी समितीचे गठण करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गतची कामे पूर्ण करण्यास विलंब होत असल्याबाबत

**(१०) * ९९३२८ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील (१) प्र.रा.मा-७ कावळगाव-बळेगाव-भोकसखेडा कि.मी.०/०० ते ८/०० (ता.देगलूर) व (२) रामा २७०- बामणी-अंजनी-प्र.रा.मा-७ कि.मी.०/०० ते १०/५०० (ता.बिलोली) या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मंजूर कामाचे कंत्राट मे. इन्डोटेक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. नांदेड व मे. इन्डोटेक इन्फ्रा. प्रा.लि. पुणे या कंपनीस माहे जून, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामे कंपनीने अपूर्ण केली असून उक्त कंपनीस वारंवार मुदतवाढ देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर काम तात्काळ पूर्ण करण्यासह कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशतः खरे आहे.
(३) सदर दोन्ही कामांना निधीची कमतरता असल्याने कंत्राटदारास नियमाप्रमाणे दि.३१.०३.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तद्नंतर दि.०१.०४.२०१७ पासून रु.१०००/- प्रतिदिन याप्रमाणे नुकसान भरपाई म्हणून दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच सदर कामांचे सुक्ष्म स्तर निहाय नियोजन करुन (१) प्र.रा.मा.७ कावळगाव-बळेगाव-भोकसखेडा, किमी ०/० ते ८/२०० ता.देगलूर हे काम दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे. (२) रामा २७०-बामणी-अंजनी-प्र.रा.मा.७, किमी ०/० ते १०/५०० ता.बिलोली हे काम दि.३१.०३.२०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यात कर्णबधिर विद्यालयात बेरा टेस्टची सुविधा नसल्याबाबत

**(११) * ९५९५० श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यात कर्णबधिर विद्यालयात प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असलेली बेरा टेस्टची सुविधा नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्णबधिर मुलांच्या पालकांना सदर टेस्टच्या प्रमाणपत्रासाठी या मुलांना घेऊन मुंबई, पुणे व औरंगाबाद येथे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तपासणीची सुविधा जिल्हा सामान्य रूग्णालयात उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) बुलढाणा जिल्हयामध्ये शासकीय रूग्णालयात बेरा टेस्टची सुविधा नाही हे खरे आहे.

तथापि, कर्णबधीर विद्यालयात प्रवेश घेण्यासाठी बेरा टेस्टची आवश्यकता नाही.

(२) सामान्य रूग्णालय, बुलढाणा येथे कर्णबधीर विद्यार्थ्यांची ऑडिओमेट्री तपासणी करून प्रमाणपत्र वितरित करण्यात आले आहे. यापैकी कोणत्याही विद्यार्थ्याला पुढील तपासणीकरीता मुंबई, औरंगाबाद किंवा पुणे येथे पाठविण्यात आले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षणाच्या प्रवेशासाठी द्यावे लागणाऱ्या हमीपत्राबाबत

**(१२) * ९५२७७ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर),**

**श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस. केलेल्या विद्यार्थ्यांनी शासकीय रुग्णालयात एक वर्ष मोफत सेवा व ग्रामीण भागात एक वर्षाची वैद्यकीय सेवा देण्याचे हमीपत्र दिल्यानंतरच त्यांना पदव्युत्तर शिक्षणासाठी शासकीय महाविद्यालयात प्रवेश दिला जाईल असे बंधनकारक केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी अशाप्रकारचे हमीपत्र देण्याची अट नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी वैद्यकीय महाविद्यालये व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये येथून पदव्युत्तर शिक्षण घेण्याच्या असणाऱ्या अटींमध्ये फरक असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, खाजगी व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर शिक्षणासाठी वेगवेगळया नियमांमध्ये सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस. पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी एक वर्षाची बंधपत्रित सेवा पूर्ण केल्याशिवाय त्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमास पात्र ठरविण्यात येणार नाही असे आदेश ऑक्टोबर, २०१७ मध्ये निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि, बंधपत्रित सेवा करणे आवश्यक असले तरी त्यासाठी बंधपत्रित उमेदवारास नियमानुसार वेतन अदा करण्यात येते.

(२) होय, हे खरे आहे.

(३) वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रत्येक विद्यार्थ्यांवर होणारा खर्च विचारात घेता शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामार्फत आकारण्यात येणारे शुल्क हे खाजगी महाविद्यालयाच्या तुलनेत अत्यल्प आहे. शासकीय/महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर करीत असलेला खर्च हा जनतेकडून प्राप्त होणाऱ्या कराच्या उत्पन्नातून भागविला जात आहे. त्यामुळे जनतेच्या ऋणांची काही अंशी परतफेड व्हावी या मूळ उद्देशाने बंधपत्रित सेवा उमेदवारांकडून करून घेण्यात येत आहे. तसेच, ग्रामीण दुर्गम भागात आरोग्य सेवेची नितांत गरज आहे.

(४) खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेणारे जे विद्यार्थी शासनाची शिष्यवृत्ती प्राप्त करतात, अशा विद्यार्थ्यांनाही बंधपत्रित सेवा लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील शिवनेरी किल्ल्याचा किल्ले विकास मॉडेलमध्ये समावेश करून विकास करण्याबाबत

**(१३) * १०२६०६ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मभूमी असलेला शिवनेरी किल्ला तसेच सात विविध ऐतिहासिक किल्ल्यांना दरवर्षी भेट देणाऱ्या लाखो शिवप्रेमी, इतिहास संशोधक व पर्यटक यांची किल्ल्यातील मुलभूत सोयी-सुविधांच्या अभावामुळे गैरसोय होत असल्याने शिवनेरी किल्ल्याचे किल्ले विकास आराखडामध्ये समावेश करून विकास करण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार किल्ले विकास आराखडामध्ये शिवनेरी किल्ल्याचा समावेश करण्यासह या किल्ल्याचा पर्यटन केंद्र म्हणून विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) शासनाकडून राज्यातील ५ किल्ल्यांचा मॉडेल म्हणून विकास करण्यात येणार आहे. त्यामध्ये शिवनेरी किल्ल्याचा समावेश करावा, अशी विनंती करणारे पत्र प्राप्त झाले आहे.
(२) सन २०११-२०१२ मध्ये प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत शिवनेरी, तोरणा, सिंहगड, लोहगड व राजमाची या किल्ल्यांच्या विकासासाठी दि.२०/८/२०११ च्या शासन निर्णयान्वये रू.१०.०० कोटी निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला वितरीत करण्यात आला आहे. त्याशिवाय २००३-२००४ मध्ये आणि २००६-२००७ ते २०१७-२०१८ या आर्थिक वर्षांमध्ये शिवनेरी किल्ल्यासाठी रू.७३०५ लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आला असून त्यापैकी रू.६१३८ लक्ष एवढा निधी खर्च झालेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिराची कुरोली, जांभुड व आव्हे (ता.पंढरपूर) येथे पाण्याच्या विसर्गामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत

**(१४) * १०२४६४ श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री. भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पावसाळी हंगामामध्ये दिनांक ५ ते १४ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीमध्ये अतिवृष्टीचा इशारा हवामान खात्याने दिलेला होता, त्यानुसार शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी जिल्हा प्रशासनाकडून खबरदारी घेण्याच्या सुचना पाटबंधारे विभागासह सर्व विभागांना देण्यात आलेल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खबरदारीचा उपाय म्हणून कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांना टाकलेले दरवाजे काढणे गरजेचे होते परंतु याच कालावधीत अतिवृष्टी होऊन भिमा नदीपात्रामध्ये सुमारे ४०००० क्युसेस पाण्याचा विसर्ग सुरु झाला यामध्ये पंढरपूर तालुक्यातील पिराची कुरोली, जांभुड, आव्हे येथील को.प. बंधाऱ्याचे दरवाजे काढण्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे बंधा-यावरून पाणी वाहून शेतकऱ्यांच्या शेतात पाणी जाऊन ऊसासह अन्य पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत व जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) होय, अंशत: खरे आहे,

महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण२०१५/(५१०/२०१५)/सिंव्य(कामे) मंत्रालय, मुंबई-३२ दि.१४/८/२०१५ अन्वये को.प. बंधाऱ्यांना बर्गे बसविणेची कार्यवाही ऑगस्ट पासून सुरू करण्यात येते. दि.८ ते ९ ऑक्टोबर २०१७ दरम्यान ३.५ मी. उंचीचे बर्गे बसविणेत आले होते. दि.१० ते १६ ऑक्टोबर दरम्यान उजनी धरण व वीर पूर्ण क्षमतेने भरलेले असताना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस झाल्याने उजनी व वीर धरणातून पूर नियंत्रणासाठी विसर्ग सोडणे क्रमप्राप्त होते. दोन्ही धरणातून २९८३७ ते ३३४३७ क्युसेक्स इतका एकूण विसर्ग भीमा नदी पात्रात सोडण्यात आल्यामुळे बर्गे काढणे शक्य झाले नाही.

(३) बर्गे टाकण्याची कार्यवाही शासन धोरणाशी सुसंगत अशी आहे. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) पिराची कुरोली येथील नुकसान झालेल्या शेतीचे पंचनामे करणेत आले आहेत. तर जांभूड येथील नुकसानीचे पंचनामे करणेबाबत महसूल विभागाकडे कळविणेत आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## असोलवाडी (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील रस्त्याच्या कामासाठी विनापरवाना मुरुमाचे खोदकाम केल्याबाबत

**(१५) * ९६७४२ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) असोलवाडी (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील रस्त्याच्या कामासाठी ठेकेदाराने विनापरवाना या रस्त्याशेजारील शासकीय गायरान जमिनीत मुरुमासाठी खोदकाम केले असून या मुरुमाचा याच रस्त्याच्या कामासाठी वापर केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित ठेकेदाराने या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार मुरुमाचे अवैध उत्खनन करणाऱ्या व रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सदर कामाची तपासणी राज्य गुणवत्ता निरिक्षक यांच्या मार्फत झाली असून त्यांनी काम समाधानकारक असल्याचा शेरा दिला आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयातील सामान्य रूग्णालयासाठी नविन सी.टी.स्कॅन उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१६) * ९५०४६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील एकमेव असलेल्या जिल्हा सामान्य रूग्णालयातील सी.टी.स्कॅन मशीन नादुरूस्त असल्याने या रूग्णालयात सी.टी. स्कॅन करण्यासाठी येणाऱ्या रूग्णांना ९० ते १०० कि.मी. दूर असलेल्या चंद्रपूर येथे पाठविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जिल्हा सामान्य रूग्णालयात नविन सी.टी.स्कॅन मशीन मंजूर करुन तातडीने उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी नागरिकांसह लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार गडचिरोली जिल्हा सामान्य रुग्णालयास नविन सी.टी. स्कॅन मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, गडचिरोलीकरिता मे.तोशिबा यांचेकडून सी.टी.स्कॅन मशीन खरेदी करुन दि.२७/०६/२००७ रोजी कार्यान्वित झाले. सदर मशीन दि.२८/०६/२०१६ रोजी बंद पडले आहे.

जिल्हयातील गरजू रुग्णांना सी.टी.स्कॅनसाठी दूरवर जावे लागू नये, यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक, गडचिरोली यांनी स्थानिक स्तरावर दरपत्रक मागवून, धन्वंतरी हॉस्पीटल, डायग्नोस्टीक सेंटर या खाजगी संस्थेशी करार करुन मे, २०१७ पासून सी.टी.स्कॅन चाचण्यांची सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. आज पर्यंत १० रुग्णांच्या चाचण्या करण्यात आल्या आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) शासन निर्णय दि.१५/०९/२०१७ अन्वये राज्यातील आरोग्य संस्थाकरीता ३१ नग सी.टी.स्कॅन मशीन खरेदी करण्याबाबत प्रशासकीय मान्यता मिळालेली असून, त्यामध्ये जिल्हा रुग्णालय, गडचिरोलीचा समावेश आहे. मशीनच्या खरेदीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## टेंभू (ता.कराड, जि.सातारा) योजनेच्या कार्यक्षेत्रात वाळूचा उपसा केल्यामुळे बंधाऱ्याला धोका निर्माण झाल्याबाबत

**(१७) * ९५११६ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) तालुक्यातील टेंभू योजनेच्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाळूचा उपसा करण्यात येत असून याकडे योजनेच्या अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टेंभू प्रकल्पातील पाण्याची मागणी असतानाही वाळू माफियांसाठी पंपहाऊस बंद ठेवून पाणी उचलले जात नसल्याची बाबही निदर्शनास आली असून टेंभू प्रकल्पाच्या बंधाऱ्याच्या आगरीजवळ करण्यात येत असलेल्या मोठ्या प्रमाणातील वाळू उपसामुळे बंधाऱ्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांवर व त्यांना पाठिंबा देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमरेड आणि भिवापूर (जि.नागपूर) तालुक्यातील जलयुक्त शिवार योजनेतील बंधाऱ्याची कामे निविदा न काढता करण्यात आल्याबाबत

**(१८) * ९६२२१ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरेड आणि भिवापूर (जि.नागपूर) तालुक्यातील सेय, वेणी, खैरी नागोबा, नक्षी, कारगाव ग्रामपंचायतीमधील जलयुक्त शिवार योजनेतील १ कोटी ५४ लाख ३४ हजार रूपयांच्या बंधाऱ्यांची कामे निविदा न काढता करण्यात आल्याबाबतची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेमधील बंधाऱ्यांची कामे करतांना लघुसिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांनी कामाचे अर्ज व त्याच्याशी संबंधीत कागदपत्रे अथवा निविदा न काढता तातडीने केल्यामुळे बंधाऱ्यांला तडे गेले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बंधाऱ्यांच्या कामांच्या कंत्राटांची निविदा न काढता कंत्राट देणाऱ्या लघुसिंचन विभागाचे अधिकारी व संबंधीत ग्रामपंचायत सरपंच, सदस्य व ग्रामसेवक यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंगणवाडयांना पुरवठा करण्यात येणाऱ्या टेक होम रेशनचा (THR) वाढविण्यात आलेल्या दराचा लाभ बचत गटांना देण्याबाबत

**(१९) * १००९०१ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या एकात्मिक बालविकास केंद्राअंतर्गत अंगणवाडीमधील लहान बालके व गर्भवती माता यांच्यासाठी पुरवठा करण्यात येणाऱ्या टेक होम रेशनचे (THR) दर दिनांक ३० एप्रिल, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार वाढविण्यात आले असून यांची अंमलबजावणी दिनांक २० जुलै, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरू झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये दिनांक १ एप्रिल, २०१४ पासून ज्या बचत गटांनी टेक होम रेशन वाटपाचे काम केले अशा बचत गटांना याचा लाभ मिळावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मुख्य सचिव यांचेकडे दिनांक ३ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) दिनांक ३० एप्रिल, २०१४ च्या केंद्र शासनाच्या निर्णयानुसार बळकटीकरण व पुनर्रचना योजना राज्यातील २० जिल्हयांना लागू केली होती. सदर योजने अंतर्गत प्रति लाभार्थी १/- रु. वाढ पोषण आहारासाठी लागू करणेबाबत केंद्र शासनाचे निर्देश होत. तथापी राज्य शासनाच्या मंत्री मंडळाने (कॅबिनेटने) सदर वाढ १ एप्रिल, २०१७ पासुन लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे व सदर दरवाढ गरम ताजा आहार व टेक होम रेशन पुरवठा करणारे सर्व पुरवठाधारकांना एक समान २० जुलै, २०१७ च्या शासन निर्णयानुसार १ एप्रिल, २०१७ पासुन प्रति लाभार्थी १/- रु. वाढ लागू केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हा परिषदेमध्ये एल.ई.डी. बल्ब खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(२०) * १०१४२४ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा परिषदेमधील अनेक गावांकरिता खरेदी करण्यात आलेल्या एल.ई.डी. बल्ब खरेदीमध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) व (३) जिल्हयांतील ग्रामपंचायती मध्ये झालेल्या एल ई डी बल्ब दिवे खरेदीबाबत चौकशी करणेची कार्यवाही सुरू असून ग्रामपंचायत कुंडलापूर येथील अनियमिततेबाबत संबंधित ग्रामसेवक यांना निलंबीत करून विभागीय चौकशी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंदगड व गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांबाबत

**(२१) * ९६९२२ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील १३ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदांपैकी ८ पदे रिक्त असून गडहिंग्लज तालुक्यातील १३ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदांपैकी ५ पदे रिक्त असल्याने ग्रामीण भागातील आरोग्य सेवा विस्कळीत झाली असून त्यामुळे सर्वसामान्य जनतेला चांगल्या वैद्यकीय सेवेपासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिक्त पदे भरण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यात कार्यन्वित असलेल्या ६ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी संवर्गाची एकुण १२ पदे मंजुर असून ६ पदे भरलेली व ६ पदे रिक्त आहेत. तसेच गडहिंग्लज तालुक्यात कार्यान्वित असलेल्या ६ प्राथमिक आरोग्य केंद्रे व १ जिल्हा परिषद दवाखाना यामध्ये वैद्यकीय अधिकारी संवर्गाची एकुण १३ पदे मंजुर असुन ११ पदे भरलेली व २ पदे रिक्त आहेत.

(२) होय हे खरे आहे.

(३) शासन निर्णय दि.१६.११.२०१६ अन्वये वैद्यकीय अधिकारी गट-अ ची पदे मुलाखतीद्वारे जिल्हास्तरावर भरण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ (ग्रेड पे.५४००) यासंवर्गातील ५ पदे नामनिर्देशनाने भरण्यात आलेली आहेत.

तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे ५४००) संवर्गातील ३९४ रिक्त पदांची जाहिरात दि.८.९.२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने १६०८ अर्ज प्राप्त झाले त्यानुसार दि.४ व दि.५ डिसेंबर रोजी समुपदेशनाद्वारे कोल्हापूर जिल्हयातील ७ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्यात आली आहेत. तसेच शासन आदेश दि.७.१२.२०१७ अन्वये शासनस्तरावरुन कोल्हापूर जिल्हयातील ३ आरोग्य अधिकाऱ्यांची पदे भरण्यात आली आहेत

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बेपत्ता व्यापाऱ्यांच्या कोट्यवधी रुपयांच्या थकबाकीबाबत

**(२२) * ९५४०९ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महालेखापालांनी राज्य शासनाच्या विक्रीकर विभागाच्या महसूलाच्या थकबाकीच्या प्रकरणांबाबत अनेकविध सूचनांसह वसुली करण्यासाठी राज्यात प्रभावी कार्यतंत्र निर्माण करण्याची शिफारस केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बेपत्ता व्यापाऱ्यांनी १२३३४ कोटी रुपयांचा शासनाचा महसूल बुडविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असलयास, तद्नुसार महालेखापालांनी सूचना केलेल्या प्रकरणांची पूर्तता करण्यासह व्यापाऱ्यांनी बुडविलेल्या रकमेची वसुली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. संदर्भीय अहवालामध्ये विक्रीकर विभागांतर्गत लापता व्यापाऱ्यांकडून प्रलंबित असलेली वसूली दिनांक ३१ मार्च २०१४, ३१ मार्च २०१५ व ३१ मार्च २०१६ अनुक्रमे रु.४५००.७५ कोटी, रु. ४९७४.२५ कोटी व रु.२८६०.१६ कोटी होती. मागील प्रलंबित असलेली वसूली पुढील वर्षामध्ये परिगणित होत असल्याने लापता व्यापाऱ्यांकडून विक्रीकर विभागाकडे प्रलंबित असलेली वसूली रु.२८६०.१८ कोटी आहे.
(३) होय.
(४) काही प्रकरणात व्यापारी व्यवसायाचे ठिकाण सोडून गेल्यामुळे व त्याचा नवीन व्यवसायाचा ठावठिकाणा सापडत नसल्याने प्रलंबित थकबाकीची वसूली होण्यासाठी अडचणी निर्माण झालेल्या आहेत. अशा सर्व ५ लाखापेक्षा जास्त थकबाकी असलेल्या प्रकरणांत आयकर विभागाशी संपर्क साधून प्रलंबित थकबाकीच्या वसूलीसाठी व्यापाऱ्याचे अद्ययावत बँक खाते व इतर तपशिल मिळविण्यासाठी विक्रीकर विभाग प्रयत्न करीत आहे.

बेपत्ता व्यापाऱ्यांच्या बाबतीत नजीकचे पोलीस स्टेशन, पोस्ट ऑफिस, कंपनी रजिस्ट्रार यांचे अभिलेख, इंटरनेट इत्यादी ठिकाणी तपासणी करुन व्यापाऱ्यांच्या उपलब्धतेबाबत खातरजमा करण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश दिलेले आहेत.

तसेच ज्या ठिकाणी अगोदर व्यापाऱ्यांचा व्यवसाय चालू होता, त्या जागेच्या बाबतीत तहसिलदार अथवा तलाठी यांचे अभिलेख, नगरपालिका अथवा महानगरपालिका यांचा मालमत्ता विभाग तसेच सब रजिस्ट्रार यांचे अभिलेख इत्यादींकडे चौकशी करुन व्यापाऱ्यांचे ठावठिकाणा व मालमत्ता शोधण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
(५) लागू नाही.

-----------------

## मुरूड जंजीरा (जि.रायगड) येथील नांदगाव ग्रामपंचायत हद्दीमध्ये वन क्षेत्रपालांनी केलेली कारवाई

**(२३) * ९८४२६ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरूड जंजीरा (जि.रायगड) येथील नांदगाव ग्रामपंचायत हद्दीमध्ये एका बंगल्यावर फणसाड अभयारण्यातील वन क्षेत्रपाल यांनी केलेल्या कारवाईत बंगल्यामध्ये साग व शिसव लाकूड तोडण्याचे मशीन, चिरकाम करण्याची रंधा मशीन इत्यादी जप्त केल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साग व शिसव वृक्षांच्या लाकडांची किंमत लाखो रूपये असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मुरुड जंजीरा, जि-रायगड येथील नांदगाव ग्रामपंचायत हद्दीमधील श्री.राजेश बहल यांच्या बंगल्याची गुप्त बातमीवरुन वनक्षेत्रपाल, फणसाड, वन्यजीव अभयारण्य यांनी दिनांक ५.९.२०१७ रोजी झडती घेतली असता त्यामध्ये अवैध वृक्षतोडीची साग व शिसव लाकडे आढळून आले. तसेच फर्निचरसाठी लाकडांचे मशीनवर चिरकाम करुन तुकडे केल्याचे आढळून आल्याने संबंधित साग व शिसव लाकडे तसेच लाकूड चिरकाम करण्याची रंधा मशीन, ड्रील मशीन व इतर अवजारे जप्त करण्यात आली.

(२) श्री.राजेश बहल यांच्या बंगल्यात जप्त करण्यात आलेले साग व शिसव लाकडाचे एकूण तुकडे ३३४, घ.मी.१.२१५ एवढे असून सदर लाकडाची अंदाजित किंमत रु.२०,८८२/- एवढी आहे. तसेच जप्त करण्यात आलेल्या साहित्याची एकूण किंमत अंदाजे ३५,६००/- रुपये आहे. अशा प्रकारे एकूण रुपये ५६,४८२/- एवढया किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी वनक्षेत्रपाल, फणसाड वन्यजीव, अभयारण्य यांनी दिनांक ५.९.२०१७ रोजी वनगुन्हा नोंदविला असून सदर जागेवर मिळालेला आरोपी श्री.गणेश गणपत ठोंबरे यास अटक करुन मा.न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग मुरुड यांचे कोर्टात हजर केले असता आरोपीस जामीनावर मुक्त करण्यात आले. पुढील तपास चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पाचल (ता.राजापुर, जि.रत्नागिरी) येथे अर्जुना धरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२४) * १०२०६१ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचल (ता.राजापुर, जि.रत्नागिरी) येथे अर्जुना धरणाचे काम गत १० वर्षांपासून संथगतीने सुरु असून धरण प्रकल्पांबरोबर कालव्याचेही काम केले नसल्याने शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरण प्रकल्पावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,

(३) असल्यास, या कामास लागणाऱ्या विलंबाची चौकशी करुन अर्जुना धरण व कालव्याची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे. धरणाचे काम पूर्ण झाले असून सन २०१२ पासून धरणात पाणीसाठा करण्यात येत आहे. प्रकल्पाच्या कालव्याची कामे प्रगतीपथावर असून शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत (PMKSY) समावेश करुन प्रकल्प डिसेंबर, २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) अर्जुना प्रकल्पावर ऑक्टोबर-२०१७ अखेर रु.५७१.१४ कोटी खर्च झालेला आहे.

(३) सदर प्रकल्पाचा समावेश प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेमध्ये (PMKSY) करण्यात आला असून प्रकल्पाचे काम डिसेंबर, २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भदाणे, आतकोली, जूपाडा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे रिलायन्स कंपनीने गॅस पाईपलाईन टाकण्यासाठी खोदलेल्या रस्त्याच्या पुनर्दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(२५) * ९८११९ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भदाणे, आतकोली, जूपाडा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे गॅस पाईपलाईन टाकण्यासाठी रिलायन्स कंपनीने खोदलेल्या रस्त्याची दुरुस्ती न करता खोदलेल्या जागी केवळ माती टाकली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या खोदकामामुळे वाहनचालकांसह नागरिकांना प्रवास करण्यास अडचणीचे होत असून या विरोधात स्थानिक नागरिकांनी उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांच्याकडे लेखी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त रस्त्याची पुनर्दुरुस्ती करण्यासह कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) अशी कोणतीही तक्रार उपविभाग भिवंडी व विभागीय कार्यालयास प्राप्त झालेली नाही. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) पाईपलाईन टाकण्यासाठी सदर रस्ते खोदण्याची रिलायन्स कंपनीला जिल्हा परिषदेमार्फत रीतसर परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच खोदकाम केलेल्या लांबीची पाईप लाईन टाकल्यानंतर संबंधीतांकडून तात्काळ दुरुस्ती करुन घेण्यात येत असून सदरचे काम प्रगतीपथावर आहे.

कंपनीने कोणत्याही प्रकारची दिरंगाई केल्यास रस्त्यांच्या पुनर्दुरुस्तीसाठी रु.७.०० लक्ष जिल्हा परिषदेकडे जमा केलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जायकवाडी धरणाच्या जलाशय परिसरातील मच्छिमारांच्या पुनर्वसनाबाबत

**(२६) * ९७४६२ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडी धरणाच्या जलाशय परिसरात पक्षी अभयारण्याबाबत 'इको सेस्नेटिव्ह झोन' लागू करुन जाचक निर्बंध मच्छिमारांवर लावण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जाचक अटीमुळे येथील मच्छिमारांचे व्यवसाय संपुष्टात आल्याने उक्त मच्छिमार बेरोजगार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरहू मच्छिमारांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक १२.०७.२०१७ रोजी जायकवाडी पक्षी अभयारण्याची पर्यावरण संवेदनशील क्षेत्राची (ESZ) अंतिम अधिसूचना जारी केली आहे. सदर अधिसूचनेनुसार पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात (ESZ) मासेमारी हा उपक्रम नियंत्रित असून प्रतिबंधित नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगांव जिल्हयातील सामान्य रुग्णालये व ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांबाबत

**(२७) * १०२९८४ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील सामान्य रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालय, मुक्ताईनगर, भूसावळ, रावेर, सावदा व ग्रामीण रुग्णालय, बोदवड, वरणगांव तसेच जिल्ह्यातील इतर ग्रामीण रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची नव्वद टक्के पदे बऱ्याच महिन्यांपासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्याबाबत जळगांव जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये मागणी करुनही शासनस्तरावर कोणतेही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जळगाव जिल्ह्यातील सामान्य रुग्णालये व ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

जळगांव जिल्ह्यामध्ये जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यन्वित आहेत.

सदर आरोग्य संस्थांमध्ये वैद्यकीय अधिकारी (ग्रेड पे ६६००/ग्रेड पे ५४००) व वैद्यकीय अधिकारी-गट ब, दंतशल्य चिकित्सक (गट-ब) संवर्गाची सद्यस्थितीत एकुण ३५५ पदे मंजुर असुन २३२ पदे भरलेली आहेत व १२३ पदे रिक्त आहेत. त्यात वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे ६६००) यांची ३७ पदे मंजूर असुन ७ पदे भरलेली व ३० पदे रिक्त आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे ५४००) यांची २९१ पदे मंजूर असुन २२१ पदे भरलेली आहेत.
(२) व (३) लोकप्रतिनिधींनी सदर रिक्त पदे भरण्याची मागणी केलेली आहे, हे खरे आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ संवर्गाची रिक्त पदे नामनिर्देशनाची व पदोन्नतीची भरण्याची कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितीत पदोन्नतीची प्रक्रिया मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थगित असल्याने जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गात १३० अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचा प्रस्ताव प्रलंबित आहे.

शासनाचे परिपत्रक दि. २६.१०.२०१६ अन्वये वैद्यकीय अधिकारी, गट-अ (ग्रेड पे रु.५४००) संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीमार्फत मुलाखतीद्वारे १७ पदे भरण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

तसेच दि.८.९.२०१७ रोजी शासनस्तरावरुन वैद्यकीय अधिकारी संवर्गाच्या ३९४ रिक्त पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार दि.४.१२.२०१४ व दि.५.१२.२०१७ रोजी समुदेशनाद्वारे जिल्हा रुग्णालय येथे २ पदे, जळगांव, ग्रामीण रुग्णालय, बोदवड येथे १, प्राथमिक आरोग्य केंद्र, तळेगाव येथे १, प्रा.आ.केंद्र. साळवा येथे १ अशी जळगांव एकूण ५ पदे समुदेशनाद्वारे भरण्यात आली आहेत.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ पदव्युत्तर पदवी / पदविका (ग्रेड पे ५४००) मधील दि.७.१२.२०१७ रोजीच्या शासन आदेशान्वये जिल्हा रुग्णालय,जळगांव येथे ३ पदे व तालुका आरोग्य अधिकारी, जामनेर, जि.जळगांव येथे एक पद भरण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ वन विभागातील दक्षिण आर्णी वनपरिक्षेत्राच्या हद्दीत सागवानाची वृक्षतोड केल्याबाबत

**(२८) * ९९०३० श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ वनवृत्तांतर्गत यवतमाळ वन विभागातील दक्षिण आर्णी वनपरिक्षेत्राच्या हद्दीत तब्बल ४० लाखांवर सागवानाची वृक्षतोड करून चोरट्यांनी पळविल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार वन विभागाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

यवतमाळ वनवृत्तांतर्गत यवतमाळ वन विभागातील दक्षिण आर्णी (प्रादेशिक) वनपरिक्षेत्रातील कक्ष क्रमांक ४१ कुऱ्हा बिटमध्ये एकुण-२३ सागवान वृक्षाची अवैध वृक्षतोड दिनांक ६.८.२०१७ चे मध्यरात्री झाली असून प्रत्यक्ष नुकसानीची किंमत रुपये २२,२३५/- एवढी आहे.

(२) सदर प्रकरणी वनगुन्हा क्र.१०३/०४ दिनांक ६.८.२०१७ अन्वये जारी करण्यात आला आहे. गुन्हयाबाबत चौकशी करण्यात येत आहे.

(३) व (४) सदर वनगुन्हयातील ४ आरोपींना अटक करण्यात आले होते. त्यांना जामीन मंजूर होऊन सुटका करण्यात आलेली आहे. सोबतच्या वनगुन्हयामध्ये वापरण्यात आलेले वाहन तवेरा TS-१२/ED ८८८२ हे जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणी वनगुन्हयाची विस्तृत चौकशी करुन दोषींवर दोषारोप पत्र दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यातील शासकीय रुग्णालये, नर्सिंग होम व खासगी औषध विक्री दुकानांमध्ये जेनेरिक औषधे उपलब्ध नसल्याबाबत

**(२९) * १०१५१९ श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने अत्यल्प किमतीत मिळणाऱ्या जेनेरिक औषधांना प्रोत्साहन देण्याची योजना राबविली असताना राज्यात केवळ ८१ जेनेरिक औषधांची दुकाने आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बहुतेक शासकीय रुग्णालये, नर्सिंग होम व खासगी औषध विक्री दुकानांमध्ये जेनेरिक औषधे उपलब्ध नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात शासकीय रुग्णालये, नर्सिंग होम व खासगी औषध विक्री दुकानांमध्ये जेनेरिक औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व त्याचे स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही. अन्न व औषध प्रशासनाकडून राज्यात देण्यात आलेल्या एकूण परवान्यापैकी १९८ परवाने केंद्र शासनाच्या जेनेरिक औषधांच्या योजनेअंतर्गत असणाऱ्या औषध विक्री दुकानांना देण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) राज्यातील वैद्यकीय शिक्षण व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व शासकीय रुग्णालयामध्ये रुग्णांना जेनेरीक औषधे पुरविली जातात. तसेच वैद्यकीय शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील रुग्णालय परिसरात जेनेरिक औषधे उपलब्ध होण्याकरीता संचालनालयामार्फत "स्वारस्याची अभिव्यक्ती" ई-निविदेद्वारे प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच केंद्र शासनाच्या अमृत (AMRIT-Affordable Medicines and Reliable Implants for Treatment) या योजनेअंतर्गत प्रामुख्याने कर्करोग व हृदयविकार संबंधी लागणाऱ्या बाबीं रास्त दरात रुग्णांना उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने वैद्यकीय शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील नागपूर येथील रुग्णालयांमध्ये पथदर्शी स्वरुपात अमृत आऊटलेट फार्मसी सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सोनोग्राफी सेंटरवर 'ॲक्टीव्ह ट्रॅकर' बसविण्याबाबत

**(३०) * ९५२५४ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुलींचा घटता जन्मदर विचारात घेता गर्भलिंग निदान चाचणी व स्त्री भ्रुण हत्येला आळा घालण्यासाठी मध्यप्रदेश मधील इंदूर येथील ॲक्टीव्ह ट्रॅकरचा झालेला यशस्वी प्रयोग महाराष्ट्र राज्यात राबविण्याबाबत राज्य महिला आयोगाने शासनाकडे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ॲक्टीव्ह ट्रॅकरमुळे सर्व सोनोग्राफी सेंटरवर झालेल्या चाचण्याचा तपशील शासनाला मिळणार असल्याने लिंग निदानावर नियंत्रण राहणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू यंत्रणा राज्यातील सर्व सोनोग्राफी सेंटरवर बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) नाही.

केंद्र शासनाने संचालक, पीसीपीएनडीटी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या तज्ञांच्या समितीची नवी दिल्ली येथे दि.२४.८.२०१५ रोजी बैठक आयोजित केली होती. या बैठकीत समितीने ॲक्टीव्ह ट्रॅकर हे लिंग निदान प्रक्रियेस आळा घालण्यास उपयुक्त यंत्र नसल्याचे सांगीतले आहे.

(३) सोनोग्राफी सेंटरवर अॅक्टीव्ह ट्रॅकर बसविणेचा निर्णय शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मिणचे (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) गावाजवळील मोरेवाडी आणि म्हसवे या दोन गावांना जोडणारा पूल कोसळल्याबाबत

**(३१) * ९५२५० श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिणचे (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) गावाजवळील मोरेवाडी आणि म्हसवे या दोन गावांना जोडणारा पूल दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास कोसळला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पूल कोसळल्यामुळे या दोन्ही गावांचे दळणवळण बंद झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार या ठिकाणी नवीन पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची  कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे. सदरचा दगडी पूल जूना असून अतिवृष्टीमुळे कोसळला आहे.
(२) अंशत  खरे आहे. तथापि, दोन्ही गावास जोडण्याकरीता अ) प्रजिमा ४८ पासून दारवड बसरेवाडी कोळवण पाळेवाडी गिरगाव हेदवडे फये निष्पप रा.मा. १७९ ला मिळणारा इतर जिल्हा मार्ग क्र. १९३, ब) प्रजिमा २८ पासून मोरेवाडी भाटीवडे महालवाडी ते प्रजिमा ४८ मिळणारा इतर जिल्हा मार्ग क्र. १०३ व क) म्हसवे मोरेवाडी ग्रामीण मार्ग क्र. ८९ हे तीन पर्यायी मार्ग उपलब्ध आहेत.
(३) जिल्हा परिषदेमार्फत सदर पुलाची पहाणी करण्यात आली आहे.
(४) सदर ठिकाणी नवीन पुल बांधण्याकरीता अंदाजे रु.१८०.०० लक्ष निधीची आवश्यकता आहे. सदर निधी मागणीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे जिल्हा परिषदेमार्फत सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घुईखेड (ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती) या बेंबळा प्रकल्पांतर्गत पुनर्वसीत गावाला मुलभूत सोयी सुविधा मिळण्याबाबत

**(३२) * ९६३७९ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घुईखेड (ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती) गाव बेंबळा प्रकल्पाअंतर्गत सन २००८ पासून पुनर्वसीत असुन या गावामध्ये अद्‌याप नागरी सुविधा अपूर्ण असल्याचे दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेंबळा प्रकल्प व जिल्हा पुनर्वसन विभाग अमरावती यांनी कागदोपत्री भूखंड योग्य असल्याचे दर्शवून गावकऱ्याना भुखंड वाटप केले परंतु त्यांच्या घरापर्यंत अद्‌यापही रस्ते, विज, नाली अशा कोणत्याही मुलभूत सोई सुविधा नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुनर्वसीत गावाची पाहणी शासनाने केली आहे काय व त्यानुसार पुनर्वसीत गावात मुलभूत सोयी सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजा घुईखेड (ता.चांदुररेल्वे, जि.अमरावती) हे पुनर्वसित गावठाणात बेंबळा प्रकल्पांतर्गत द्‌यावयाच्या १८ नागरी सुविधापैकी १४ नागरी सुविधा पुर्ण झालेल्या आहेत. व ईतर नागरी सुविधाची कामे प्रगतीत आहे.
(२) हे खरे नाही.

पुनर्वसीत गावठाणात अंतर्गत रस्ते विज, नाली, हया नागरी सुविधाची कामे पुर्ण झाली आहेत.
(३) अपूर्ण असलेल्या सुविधाची कामे प्रगती पथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर वन विभागाच्या परवानगी अभावी रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३३) * १०३४०२ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील खोपोली एक्झिट ते कुसगाव या भागातील २० कि.मी. रस्त्याच्या विस्तारीकरणासाठी दोन बोगदे व दोन पुलांसह आठ

पदरी नवीन रस्ता बांधण्याच्या कामास शासनाने दिलेल्या मंजुरीला एक वर्ष होऊनही सदर कामास सुरुवात केली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामासाठी वन विभागाची परवानगी आवश्यक असून वन विभागाकडे सदरहू प्रस्ताव सहा महिन्यापासून मान्यतेअभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू काम वेळेत पूर्ण होण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील खोपोली-लोणावळा-कुसगाव रस्त्याच्या बांधकामाकरीता पुणे व अलिबाग वनविभागातील वनक्षेत्र वळतीकरणाकरीता सर्वप्रथम दि.१४.०३.२०१६ रोजी ३४.५३ हे. वनक्षेत्राची मागणी केली. तद्नंतर दि.२०.०१.२०१७ रोजी ४६.८३ हे. तर दि.३०.०६.२०१७ रोजी ६४.८० हेक्टर वनक्षेत्र मागणीचा सुधारीत प्रस्ताव सादर केला. उक्त प्रमाणे सादर केलेला प्रस्ताव वन (संवर्धन) अधिनियम, १९८० मधील तरतुदीनुसार परिपूर्ण नसल्याने त्रुटीपूर्ततेकरीता प्रकल्प यंत्रणेस कळविले आहे.

प्रकल्पाचे काम तातडीने कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने वन विभागाने प्रकल्पामध्ये बाधित होणा-या वनक्षेत्राची निश्चिती व वृक्षांची गणना केली असून वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत परिपूर्ण प्रस्ताव प्रकल्प यंत्रणेकडून प्राप्त होताच वन विभागाकडून आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात येऊन प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेकरीता सादर करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बालविकास प्रकल्प अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षक व सेविकांच्या रिक्त पदांबाबत

**(३४) * १०३७११ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सद्यस्थितीत बालविकास प्रकल्प अधिकारी ४०६, अतिरिक्त प्रकल्प अधिकारी ३६६, अंगणवाडी पर्यवेक्षक ६७८, अंगणवाडी सेविका १५४७, अंगणवाडी मदतनीस ५०७९ आणि मिनी अंगणवाडी मदतनीस १३९७ अशी मिळून एकूण ९४७३ पदे रिक्त असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बालविकास प्रकल्प अधिकारी, अतिरिक्त प्रकल्प अधिकारी अंगणवाडी पर्यवेक्षक, सेविका व मदतनीस यांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, रिक्त पदांची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदे |
|---|---|---|
| १. | बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) वर्ग -१ | ३० |
| २. | बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण/ आदिवासी) वर्ग-२ | २६४ |
| ३. | मुख्यसेविका | ७२२ |
| ४. | अंगणवाडी सेविका | १६७२ |
| ५. | मिनी अंगणवाडी सेविका | १२४४ |
| ६. | अंगणवाडी मदतनीस | ५२९६ |

(२) व (३) बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची १४५ पदे सरळ सेवेने भरण्यात आलेली असून ४५ पदासाठी मागणीपत्र लोकसेवा आयोगाकडे सादर करण्यात आलेले आहे.

नागरी प्रकल्पातील मुख्यसेविका भरती प्रकरणी अंगणवाडी कर्मचारी संघटनेने आक्षेप घेतल्यामुळे तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. तसेच जिल्हा परिषद आस्थापनेवरील ग्रामीण/आदिवासी प्रकल्पातील मुख्यसेविकांच्या भरतीबाबत जिल्हापरिषद स्तरावर कार्यवाही करण्यात येते.

तसेच अंगणवाडी सेविका/मिनी अंगणवाडी सेविका/मदतनीस या मानधनी पदांची रिक्त पदे भरणेबाबतच्या प्रक्रियेस तुर्तास वित्त विभागाच्या सूचनेनुसार स्थगिती देण्यात आलेली आहे.

-----------------

## जळगाव जिल्हयात मागील वर्षाची जलयुक्त शिवार योजनेतील कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(३५) * १००७३७ श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयात मागील वर्षाची जलयुक्त शिवार योजनेतील २९ टक्के कामे निकृष्ट दर्जाची झाली असून याबाबत चौकशी करण्याचे आदेश जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची चौकशी शासनाने केली आहे काय, व चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुसार जलयुक्त शिवार योजनेतील कामे निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

तथापि, जलयुक्त शिवार अभियान कामांबाबत तपासणी करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या त्रयस्थ यंत्रणेमार्फत तक्रारी असलेल्या कामांची तपासणी करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यात आला आहे.

(२) व (३) तक्रार प्राप्त कामांची ग्रीनहोप फाऊंडेशन, एरंडोल या त्रयस्थ संस्थकेडून तपासणी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोरेगाव (ता.खेड, जि.पुणे) ग्रामपंचायतीमध्ये यशवंत घरकुल योजनेंतर्गत झालेला गैरव्यवहार

**(३६) * १०३५८७ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (ता.खेड, जि.पुणे) या ग्रामपंचायतीला यशवंत घरकुल योजनेंतर्गत सन २००९ ते २०१४ दरम्यान मंजूर घरकुलांसाठी बांधकामापोटी

अनुदानाची एकूण रुपये १३ लाख ८० हजार ग्रामनिधी खात्यात जमा झाला असून त्यामधून रुपये १० लाख १५ हजार अनुदान लाभार्थ्यांस अदा करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीवाटपामधे तसेच शिल्लक राहिलेल्या रुपये ३ लाख ६५ हजार इतक्या रकमेचा अपहार झाल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने विस्तार अधिकारी (पंचायत) तथा चौकशी अधिकारी पंचायत समिती खेड यांनी चौकशी करून दिनांक ०५ सप्टेंबर,२०१५ रोजी चौकशी अहवाल शासनास सादर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने ग्रामपंचायतीचे न.न ५ सामान्य कॅश बुक व्हाउचर फाईल व इतर आवश्यक लेखे आढळून न आल्याने अनुदानाच्या रकमेचा दुर्विनियोग केल्याची शक्यता असल्याचे आढळून आल्याने तत्कालीन ग्रामसेवक तसेच तत्कालीन उपसरपंच यांना उपरोक्त अभिलेखे ७ दिवसांत उपलब्ध करण्याचे आदेश दिनांक ३ जून,२०१७ रोजी गट विकास अधिकारी खेड यांनी देवूनही अद्याप ग्रामपंचायतचे महत्वाचे असे आर्थिक अभिलेखे व दप्तर उपलब्ध न करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्यासह सदर रकमेच्या खर्चाचा तपशील देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय

(२) चौकशी समितीने सदर अहवाल गट विकास अधिकारी यांचेकडे सादर केलेला आहे.

(३) पंचायत समिती कार्यालय, खेड दि. ३/६/२०१७ च्या आदेशानुसार ग्रामपंचायत नमुना ५ सामान्य रोजकिर्द, कॅश बुक, अनुदान अदायगीची पडताळणी केली यशवंत घरकुल योजनेंअंतर्गत मंजूर घरकुलांचे दोन हप्त्यात गट विकास अधिकारी,खेड यांनी अनुदान अदा केलेले असून उर्वरीत अनुदान लाभार्थ्यांस देणे बाकी आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोदावरी आणि तापी खोऱ्यातील विदर्भाच्या वाटणीचे पाणी विदर्भाला मिळण्याबाबत

**(३७) * ९६०१३ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गोदावरी खो-यामध्ये विदर्भाला लवादाने १९१९० दलघमी पाणी दिले परंतु बांधकामासाठी प्रकल्प हाती न घेतल्यामुळे ४३८८ दलघमी व अपूर्ण प्रकल्पांमुळे ७७१३ दलघमी असे एकूण १२,१०० दलघमी पाणी अजून वापरात आलेले नाही, त्यामुळे हे पाणी आंध्र व तेलंगणा ही राज्ये वापरीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चुकीची आकडेवारी आणि बांधकामाधीन प्रकल्पामुळे गोदावरी आणि तापी खो-यातील विदर्भाच्या वाटयाचे पाणी अद्याप मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार विदर्भाच्या वाटयाचे असलेले पाणी न अडविण्याची कारणे काय आहेत तसेच पाणी न अडविणाऱ्या संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही,

राज्यात गोदावरी खो-यामध्ये विदर्भाला गोदावरी पाणीतंटा लवादानुसार १९९७ च्या अभ्यासाप्रमाणे १९१९० दलघमी पाणी अनुज्ञेय होते. तथापि सन २०१४ मधील अभ्यासानुसार पाणी उपलब्धता कमी होऊन गोदावरी खो-यामध्ये १८०५७ दलघमी पाणी वापराकरीता उपलब्ध होत आहे. यातून पूर्ण प्रकल्पाचे ५९५६ दलघमी व नदीवरुन बिगर सिंचन वापर ५२१ दलघमी असा एकूण ६४७७ दलघमी पाणी वापर निश्चित झाला असून ८१०३ दलघमी पाणी वापराचे प्रकल्प बांधकामाधीन आहेत. ४२४३ दलघमी पाणीवापराचे प्रकल्प नियोजनाधीन आहेत.

(२) गोदावरी खोऱ्यातील प्रकल्पांना वनमान्यता व पर्यावरण मान्यतेस लागणाऱ्या विलंबामुळे बांधकामाधीन व इतर नियोजनातील प्रकल्प पूर्ण करण्यास विलंब लागत आहे.

तापी खोऱ्यामध्ये २६०७.७५ दलघमी पाणी उपलब्ध असून उपलब्ध पाण्याचे नियोजन झालेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोरपना-राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील निमणी-निंबाळा या परिसरात रानडुकरांनी पिकांचे केलेले नुकसान

**(३८) * ९८५२५ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपना-राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील निमणी-निंबाळा या परिसरात रानडुकरांनी मोठया प्रमाणात कापूस व सोयाबीन पिकांचे नुकसान केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रानडुकरांचा बंदोबस्त करण्याबाबत वन विभागाकडे मागणी करुनही अदयाप याबाबत कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन रानडुकरांचा बंदोबस्त करण्यासह नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) कोरपना-राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील निमणी-निंबाळा या गावांमध्ये माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये रानड्डुकरांनी शेतपिकांचे नुकसान केल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापि सदर गावांच्या

परिसरातील कळमना या गावामध्ये माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये रानडुकराने शेतपिकाचे नुकसान केल्याचे १ प्रकरण निदर्शनास आले असून प्रस्तुत प्रकरणी प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधितास नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधारी (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) परिसरातील रस्त्याच्या दुरुस्तीसह भोरडी नदीवरील पुलाची ऊंची वाढविण्याबाबत

**(३९) * १०२९५७ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधारी (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) परिसरातील सुमारे १५ ते २० गावांचा रहदारीचा मुख्य रस्ता असलेल्या आळंद-अंधारी-मोहरा रस्त्याची दुरवस्था झाली असून या रस्त्यावरील भोरडी नदीवरील पूलही धोकादायक झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता व पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्याची व पुलाची दुरुस्ती करण्यासह सदर पुलाची ऊंची वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

तथापि रस्त्याचा पृष्ठभाग काही लांबीत खड्डे पडून क्षतिग्रस्त झाला असून खड्डे भरण्याचे काम प्रगतीत आहे. भोरर्डी नदीवर बुडणारा पूल असून तो सुस्थितीत आहे.

(२), (३) व (४) रस्त्याच्या दुरूस्तीचे काम प्रगतीत आहे. रस्त्याच्या काही क्षतिग्रस्त लांबीतील डांबरीकरणाचे काम प्रगतीत आहे.

भोरर्डी नदीवरील उंच पूल बांधणेचे काम निधी, निकष व अग्रक्रमानुसार हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

-----------------

## कासार बालकुंदा (ता.निलंगा, जि.लातूर) येथील पाच अंगणवाड्यांमध्ये दिला जाणारा खाऊ बंद केल्याबाबत

**(४०) * १०३४५१ श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील कासार बालकुंदा येथील पाच अंगणवाड्यांमधील ३०० चिमुकल्यांना व गरोदर मातांना दिला जाणारा खाऊ बंद केल्याचे दिनांक १८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाऊ शिजवून देणाऱ्या बचत गटांना मागील १० महिन्यांपासून ठरलेले मानधन न मिळाल्यामुळे त्यांनी खाऊ शिजवून देणे बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांकडे आर्थिक तरतूद शिल्लक नसल्याने बचत गटाच्या माध्यमातून अंगणवाड्यांमध्ये दिला जाणारा खाऊ बंद झाल्याने या बालकांवर उपासमारीची वेळ येऊन याचा उपस्थितीवर परिणाम झाला आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याची चौकशी करुन अगणवाड्यांमध्ये दिला जाणारा खाऊ पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) नाही.

(३) नाही. दिनांक १८ ऑगस्ट २०१७ रोजी पर्यवेक्षिका यांनी सदर बचत गटाचा पुरक पोषण आहार संबंधित बचत गटांनी कोणतीही पुर्वसुचना न देता बंद केल्याची माहिती प्राप्त होताच तात्काळ नजिकच्या गावातील अंगणवाडीतील महिला साहस सोलापूर यांचेकडील पुरविण्यात आलेला पुरक पोषण आहार मौ.कासार बालकुंदा येथील पाचही अंगणवाड्यांमध्ये उपलब्ध करुन देवून त्या पाचही अंगणवाडीतील मदतनीस यांचेकडून सदरचा आहार तयार करुन अंगणवाडीतील बालकांना देण्यात आलेला आहे. मौ. कासार बालकुंदा येथील पाच अंगणवाडयांचा खाऊ बंद झाल्याने अंगणवाडयातील कोणत्याही बालकांवर उपासमारीची वेळ आलेली नाही व वेळेत पर्यायी व्यवस्था केल्याने अंगणवाडीतील उपस्थीतीवर याचा कोणताही परिणाम झालेला नाही.

(४) स्थानिक महिला बचत गटाने गरम ताजा आहार पुरवठा करणे बंद केल्याने बालके आहारपासून वंचित राहू नयेत यादृष्टीने अंगणवाडी केंद्रास कोरडा पुरक पोषण आहार पुरवठा करुन अंगणवाडी मदतनीस मार्फत सदरचा आहार शिजवून अंगणवाडयामधील बालकांना आहार देवून विनाखंड खाऊ देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे सुप्पा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील सिमेंट नाला बांधचे पाणी शेतात शिरुन शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

**(४१) * ९६८५४ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सुप्पा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील जलसंधारण विभाग नांदेड यांच्या तर्फे करण्यात आलेल्या सिमेंट नाला बांध क्रमांक तीन मध्ये कंत्राटदाराने योग्य भराव न टाकल्यामुळे पहिल्याच पावसात बांधाचे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात शिरुन शेतीचे नुकसान झाल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटदाराच्या दिरंगाईमुळे व संबंधित अधिकाऱ्यांनी निकृष्ट दर्जाचे काम करुन घेतल्यामुळे बांधाचे पाणी शेतात जाऊन नुकसान झाल्याचे तेथील शेतकऱ्यांनी निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधीत जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रस्तुत प्रश्नात उल्लेखित सुप्पा सिमेंट नाला बांध क्र.३ (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) चे नाव सुप्पा नसून तुप्पा सिमेंट नाला बांध क्र.३ असे आहे.

(२) हे खरे नाही.

माहे जून, २०१७ च्या पहिल्या आठवडयात झालेल्या अतिवृष्टीमुळे प्रस्तुत बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूस पार्श्व वहन (Out Flanking) झाले आहे, मात्र शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान झालेले नाही. त्यानंतर सदर कामाची पार्श्व वहन दुरूस्ती कंत्राटदाराने त्वरीत पूर्ण केली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निम्न तेरणा (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) उजवा कालव्यावरील पेठसांगवी, एकोंडी व कवठा येथे पूल बांधण्याबाबत

**(४२) * १०२४४२ श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निम्न तेरणा प्रकल्प, माकणी (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथील निम्न तेरणा उजवा कालव्यातील पेठसांगवी एकोंडी व कवठा येथे अनुक्रमे कि.मी. १२, २२ व २५ या अंतरावर आवश्यक तेथे पूल बाधण्यांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, निम्न तेरणा कालवा विभाग क्र.२, लातूर यांना दिनांक ०१ एप्रिल, २०१३ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे सुचित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे या परिसरातील नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?.

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ३०.०३.२०१३ रोजीच्या त्यांच्या निवेदनाद्वारे कार्यकारी अभियंता, निम्न तेरणा कालवा विभाग क्र. २, लातूर, यांना सूचित केले होते.

(२) व (३) उक्त निवेदनाच्या अनुषंगाने निम्न तेरणा उजव्या कालव्यावरील सा.क्र.१८०१३ मी., सा.क्र.२२२७० मी.व सा.क्र.२४३९८ मी. वरील पुलांच्या कामापैकी सा.क्र.१८०१३ मी. वरील पुलाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. सा.क्र.२४३९८ मी. व सा.क्र.२२२७० मी. वरील पुलांच्या कामाचा समावेश निम्न तेरणा प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारीत प्रशासकीय अंदाजपत्रकात करण्यात आलेला असून अंदाजपत्रक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद महामंडळाचे पत्र क्र.गोमपाविम/ तां-१/४३१६, दिनांक ०७.०५.२०१६ अन्वये अधीक्षक अभियंता, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांना सादर करण्यात आले आहे. चतुर्थ सुधारीत प्रशासकीय अंदाजपत्रक मान्यते बाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. चतुर्थ सुधारीत अंदाजपत्रक मान्यतेनंतर पुलांचे बांधकाम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आमदार आदर्श ग्राम दत्तक योजनेसाठी निधी देण्याबाबत

**(४३) * ९९०९२ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाची आमदार आर्श ग्राम दत्तक योजना शासनाकडून कुठलाच निधी न आल्याने योजना अद्याप कार्यान्वित झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने आमदार आदर्श ग्राम दत्तक योजना सन २०१५ मध्ये पहिला टप्पा घोषित करून पुणे जिल्हयातील विधानसभा आणि विधानपरिषदेच्या २७ लोकप्रतिनिधींची गावे निवडली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व लोकप्रतिनिधींनी त्या गावामध्ये विविध विकासकामे सुध्दा सुचविली व त्याचा आराखडा व अपेक्षीत निधीची तरतूद करण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवून एक वर्ष होऊन ही कुठल्याही निधीची तरतुद करण्यात आली नसल्याने जिल्हा नियोजन अधिकारी, पुणे यांच्याकडे तात्काळ या योजनेसाठी निधी उपलब्ध व्हावा अशी मागणी दिनांक ४ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पुणे जिल्हयातील सर्व लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीनुसार सदर गावामध्ये विविध विकासकामे करण्यासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही. ग्राम विकास विभागाच्या शासन परिपत्रक दि ०८ ऑक्टोबर २०१५ अन्वये ही योजना कार्यान्वित झालेली आहे. ग्राम विकास विभागाच्या शासन परिपत्रक दिनांक ०८ ऑक्टोबर २०१५ अन्वये योजनेची कार्यपध्दतीनुसार केली आहे. त्यानुसार योजनेंतर्गत राज्य शासनाकडून थेट निधी उपलब्ध करुन देण्याची तरतूद नाही तथापि, विविध योजनांच्या क.ती संगमामधून पुर्णत ३ केंद्र/राज्य पुरस्कृत योजना/खासदार व आमदार स्थानिक विकास कार्यक्रम, केंद्र व राज्य वित्त आयोगाचे अनुदान औद्योगिक आस्थापनांचा सामाजिक उत्तरदायित्व निधी (CRS) इत्यादी स्त्रोतातून निधी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे.

(२) होय.

(३) व (४) मा.बाबुराव पाचर्णे आमदार यांनी दि. ०९ सप्टेंबर, २०१७ रोजी जिल्हा नियोजन विकास कामांसाठी जादा निधीची मागणी केलेली आहे. मा. श्री. बाबुराव पाचार्णे आमदार यांनी आमदार आदर्श ग्रामयोजनेंतर्गत दत्तक घेतलेल्या वढू (बु.) गावामध्ये एकूण ३५.८० लक्ष रुपयांची ६ विकास कामे मंजूर करण्यात आली आहेत. एकूण सहा विकास कामांपैकी ३०.२० लक्ष रुपयाची पाच कामे पुर्ण करण्यात आली असून ५.६० लक्ष रुपयाचे एक काम प्रस्तावित आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील १७ गावांतील वंचित मजुरांना रोजगाराची कामे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४४) * १०३१३८ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील १७ गावांतील वंचित मजुरांना रोजगाराची कामे उपलब्ध करून देण्यात आली नसल्याबाबत तहसीलदार, मोखाडा यांच्या कार्यालयावर दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास श्रमजीवी संघटनेच्या वतीने आंदोलन केले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजगाराची मागणी केलेल्या मजूरांना कामे देण्याबाबत मा.वित्त व नियोजन मंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री, सचिव, रोजगार हमी योजना यांच्याकडे दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास समर्थन संस्थेने लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार मोखाडा येथील ग्रामपंचायत हद्दीतील तसेच गाव-पाड्यांतील मजूरांनी रोजगाराची कामे मिळण्यासाठी तहसील प्रशासनाकडे २२७२ अर्ज दाखल केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने मजुरांना रोजगाराची कामे उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.
(२) निवेदन दिल्याची बाब खरी आहे.
(३) व (४) मोखाडा तालुक्यातील (जि. पालघर) १५ गावातील १५९८ मजुरांचे काम मागणीचे अर्ज संबंधित तहसीलदार यांच्याकडे प्राप्त झाले आहेत. त्यानुसार १५ कामांचे १५९८ मजुरांपैकी १० कामांचे ११८१ मजुरांचे ई मस्टर तयार करुन काम देण्यात आले आहे. उर्वरित ५ कामांपैकी ४१७ कामांचे ई-मस्टर तयार करण्यात आले होते. परंतु तेथे मजूर कामावर आले नाहीत. तसेच, यंत्रणांची आढावा बैठक घेवून शेल्फवरील कामे वाढविण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## "आपले सरकार सेवा केंद्र" प्रकल्पातील परिचालकांना प्रलंबित मानधन मिळण्याबाबत

**(४५) * ९५०१३ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अजित पवार (बारामती), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने संग्राम प्रकल्पाचे "आपले सरकार सेवा केंद्र" असे नामकरण करुन प्रकल्पातील परिचालकांना मासिक ६०००/- मानधन देण्याचे मान्य केले होते परंतु मागील सहा महिन्यांपासून मानधन मिळाले नसल्याने ता.जि. धुळे येथील ग्रामपंचायतीमधील २७ हजार संगणक परिचालकांनी दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ पासून बेमुदत काम आंदोलन जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच वाशिम जिल्हयातील ग्रामपंचायत परिचालक यांना पीएसटी-२ या शासनासोबत करार केलेल्या कंपनीने मागील ६ महिन्यापासून कोणताही मोबदला व मानधन दिले नाही,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सरकार सेवा केंद्र चालवणाऱ्या परिचालकांच्या वतीने टास्क कन्फर्मेशनची अट रद्द करावी, सहा हजार मानधन मिळावे, मागील कपात केलेले मानधन द्यावे, दाखल्यात ६० टक्के कमिशन मिळावे, महाऑनलाईन कडील मानधन मिळावे, सामाजिक सुरक्षा द्यावी, कामावरुन कमी केलेल्या परिचालकांना कामावर घ्यावे अशा विविध मागण्यांबाबत परिचालकांच्या संघटनेने जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांना दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनानुसार संगणक परिचालकाना प्रलंबित मानधन देण्यासह त्यांच्या विविध मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

तथापि, केंद्र चालकांचे प्रतिनिधी यांनी दि.२५/९/२०१७ पासून कामबंद आंदोलन करीत असलेबाबत शासनास कळविले होते.

(२) अंशत: खरे आहे.

(३) होय.

(४) दि.१४/१०/२०१७ रोजी विविध मागण्यांबाबत शासनास प्राप्त झालेल्या निवेदनानुसार केंद्र चालकांच्या मागण्यांबाबत केंद्र चालकांचे प्रतिनिधी व सीएससी-एसपीव्ही चे प्रतिनिधी यांच्या समवेत सचिव स्तरावर बैठक घेऊन केंद्र चालकांच्या अडीअडचणी त्वरीत सोडविण्याच्या सुचना सीएससी-एसपीव्ही यांना देण्यात आल्या आहेत. तसेच संगणक परिचालकांना जून,२०१७ पर्यंतचे वेतन देण्यात आले आहे. तसेच सुरु असलेले कामबंद आंदोलन स्थगित करुन दि.६/११/२०१७ पासून काम सुरु करत असल्याबाबत केंद्र चालकांच्या प्रतिनिधीने शासनास लेखी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धामणी (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील धनगरदरा परिसरात दोन ठिकाणी ओढयावर पूल बांधण्याबाबत

**(४६) * ९८३६५ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणी (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील धनगरदरा परिसरात इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना दोन ठिकाणी ओढयावर पूल नसल्याने भर पावसाळयात चार ते पाच महिने पाण्यातून वाट काढत ओल्या कपडयावर शाळेत जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओढयातील पाण्यात साप व इतर विषारी जलचर आढळत असल्याने विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही ओढयावर त्वरित पूल बांधावा अशी विद्यार्थ्यांच्या पालकांनी व स्थानिक ग्रामस्थांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे गेली दोन वर्षापासून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीनुसार या ओढयांवर पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अंशत खरे आहे.

(३) अशा प्रकारची मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) धनगरदरा वस्तीकडे जाणारा ग्रामीण मार्ग क्र.८८ वर सा.क्र.१/५०० व सा.क्र.२/१०० या दोन ठिकाणी नाला क्रॅास होत असल्याने त्याठिकाणी पुल वजा साकव बांधकामाची आवश्यकता आहे. जिल्हा नियोजन समिती अंतर्गत ३०५४ लेखाशिर्षाखाली निधी व निकषाच्या अधिन राहून या दोन पुल वजा साकवांची कामे प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

तसेच जिल्हा नियोजन समिती अंतर्गत साकव बांधणे या कार्यक्रमांतर्गत सदरची कामे प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेने सार्वजनिक बांधकाम विभागास कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे मरोळ गांव, अंधेरी (मुंबई) येथील मेरिंग्यू हॉटेल्स प्रा.लि. च्या व्यापारी तत्वावरील बांधकामात वनसंरक्षकांनी काढलेल्या त्रुटींबाबत

**(४७) * १०२२३७ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मौजे मरोळ गांव, अंधेरी येथील सर्व्हे क्र. ७८४ मधील ३१३२० चौ.मी. जमिनीवर मेरिंग्यू हॉटेल्स प्रा.लि. च्या व्यापारी तत्वावरील बांधकामास प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांनी त्रुटी काढल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेवर विकासकातर्फे सनदी लेखापाल यांनी प्रकल्प मुल्य ३२० कोटी रुपये दर्शविल्यानुसार रु.१०२१७४.०४ प्रति चौरस मीटर प्रमाणे प्रस्तावित प्रकल्प मुल्याच्या २% रक्कम शासनास अदा करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी यांनी त्यांचे पत्र क्रमांक का.अ./उमुंवि/प्रशा/३४०३ दिनांक २९/३/२०१६ नुसार प्रकल्प मुल्य निश्चित करतांना जमिनीची किंमत रेडीरेकनरनुसार/बांधकाम खर्च दरसूची सन २०१५-२०१६ या वर्षासाठी रुपये २८ हजार पाचशे व प्रत्येक मजल्याकरिता अतिरिक्त ०.५०% वाढविण्याचे अप्पर प्रधान मुख्य संरक्षक (वन्यजीव), बोरीवली यांना कळवूनही वन विभागाकडून जाणीवपूर्वक जुन्या पध्दतीनेच प्रकल्प मूल्य ठरवून शासनाच्या कोट्यवधी रुपयांचे महसूलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसूलाचे आर्थिक नुकसान करणाऱ्या संबंधित विकासकांवर व त्यास जबाबदार असणाऱ्या मुख्य वनसंरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, अप्पर मुख्य वनसरंक्षक (वन्यजीव) व इतर संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

दिनांक २६.१०.२०१६ रोजी झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या १२ व्या बैठकीत मेरिंग्यू हॉटेल्स प्रा. लि. च्या मरोळ गाव अंधेरी येथील सर्व्हे क्र. ७८४ मधील ३१३२० चौ. मी. वरील व्यापारी तत्वावरील बांधकाम संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीपासून १० किलो मीटरच्या आत असून प्रस्तावित पर्यावरण संवेदनशिल क्षेत्राच्या बाहेर येत असल्याने रु. १.०० कोटी इतकी रक्कम जमा करण्याच्या अटीवर प्रकल्पाची शिफारस करण्यात आली होती. मात्र केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक ०५.१२.२०१६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेत सदर क्षेत्राचा समावेश नसल्याने सदर प्रकल्प यंत्रणेकडून रु. १.०० कोटीची रक्कम घ्यावी किंवा कसे याबाबत राज्य वन्यजीव मंडळाच्या पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोपाबोडी (ता.सडक-अर्जुनी, जि.गोंदिया) येथील फायर लाईनच्या कामाबाबत

**(४८) * १०३६२८ श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोपाबोडी (ता.सडक-अर्जुनी, जि.गोंदिया) येथील १०० हेक्टर परिसरात वृक्षसंवर्धनासाठी वृक्ष रोपवन या प्लॉटच्या फायर लाईनचे यंदा काम न झाल्यामुळे तसेच वन अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे जंगलाला आग लागून ४० हेक्टर रोपवन खाक होऊन शासनाचे कोट्यवधी रुपयाचे नुकसान झाल्याचे दिनांक ११ जून २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणाचे ४ ते ५ हेक्टर फायर लाईनचे काम १० मजूरांकडून करुन घेतलेले असताना प्रत्यक्षात १०० मनुष्यबळ लावल्याची खोटी माहिती देऊन रक्कमेचा अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) गोंदिया वनविभागांतर्गत सडक/अर्जुनी तालुक्यातील नियतक्षेत्र सौंदड-१ बोपाबोडी येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत सन २०१२ मध्ये ५० हेक्टर व सन २०१३ मध्ये ५० हेक्टर असे एकूण १०० हेक्टर क्षेत्रावर रोपवन घेण्यात आले आहे. सदर दोन्ही रोपवन क्षेत्रात मंजूर अंदाजपत्रकाच्या अधीन राहून अग्नी प्रतिबंधक कामे करण्यात आली असून रोपवन क्षेत्रात वणवा लागल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मलकापूर ते अकोला दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्र.६ च्या चौपदरीकरणाकरिता रस्त्यानजिकच्या हजारो झाडांची तोड केल्याबाबत

**(४९) * ९८२७५ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर ते अकोला दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्र.६ च्या चौपदरीकरणाकरिता रस्त्यानजिकच्या हजारो झाडांची तोड करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) सन २०१२-१३ ते सन २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ च्या मलकापुर ते अकोला दरम्यानच्या चौपदरीकरणाकरिता रस्त्याच्या दूतर्फा असलेल्या अनुसूचित तसेच बिगर अनुसूचित प्रजातीच्या एकूण ५,१७१ झाडांना तोडण्याची परवानगी दिलेली आहे.

(२) व (३) सदर परवानगी महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम, १९६४ व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या तरतुदीनुसार देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील आदिवासी घरकुल लाभ धारकांना नियोजित अनुदान मिळण्याबाबत

**(५०) * ९८५६२ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील २८ ग्रामपंचायतीमधून विविध योजनांमार्फत ९४० घरकुलांची कामे सुरु असून आदिवासी घरकुल लाभ धारकांना नियोजित अनुदान मिळालेले नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार नियोजित अनुदान लाभार्थींना तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हयातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळा धोकादायक असल्याबाबत

**(५१) * ९७१९३ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या १९० शाळांच्या इमारती धोकादायक स्थितीत असल्याचा अहवाल पंचायत समितीने शासनाकडे पाठविला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालानुसार जिल्हा परिषदेच्या १९० धोकादायक शाळांच्या इमारतीची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार सदर धोकादायक शाळेच्या इमारतीच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) अमरावती जिल्हयातील ग्रामीण भागात असलेल्या जिल्हा परिषद शाळांच्या १९० इमारती धोकादायक नसुन १९६ वर्ग खोल्या नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आल्यामुळे या खोल्यांचे निर्लेखन करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

सबब, अमरावती जिल्हा परिषदेच्या शाळांच्या धोकादायक इमारती मधुन वर्ग भरीविले जात नाही. विद्यार्थ्यांना बसण्याबाबत इतरत्र व्यवस्था झालेली असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या जिवाला धोका निर्माण होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच निर्लेखित शाळांच्या इमारती बांधकामाबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हा परिषदेच्या डिजीटल वर्गासाठी खरेदी केलेल्या साहित्यात झालेला गैरव्यवहार

**(५२) * ९६२६० श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डिजीटल शाळेसाठी प्रत्येक ग्रामपंचायत किमान ५० हजारांची खरेदी करत असल्याने पेसा व १४ व्या वित्त आयोगातील साडेसात कोटींच्या निधीचा अपव्यय नाशिक जिल्हा परिषदेच्या परवानगीने सुरु असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील १५०० शाळांमध्ये डिजीटल वर्गासाठी साडेसात कोटींचा निधी कुठल्याही तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, निविदाप्रक्रिया व खरेदीप्रक्रिया यांचा अवलंब न करता डिजीटल वर्गासाठी साहित्य खरेदी केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेटफळे (जि.सांगली) येथील घरकुलांच्या कामांची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(५३) * ९६००४ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेटफळे (जि.सांगली) येथील घरकुलांची कामे पूर्ण झाली असतानाही अद्याप देयके अदा करण्यात आलेली नाहीत, तर दुसरीकडे हप्ते अडकल्याने काही लोकांची कामे अपूर्णवस्थेत ठेवण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच घरकुले ऑनलाईन करण्याच्या नावाखाली ग्रामपंचायतीचे कर्मचारी लोकांकडून पैसे घेत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार घरकुलांची प्रलंबित देयके अदा करुन अपूर्ण घरे पूर्ण करण्यासह लोकांकडून बेकायदेशीरपणे घरकुले ऑनलाईन करण्यासाठी पैसे घेणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मनमाड (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथील उपजिल्हा रुग्णालयात कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रियेमध्ये एका महिलेचा झालेला मृत्यू

**(५४) * ९९२१२ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथील उपजिल्हा रुग्णालयात कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रियेसाठी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ रोजी रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या महिलांना वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे

शस्त्रक्रियेसाठी देण्यात आलेल्या भूलीचा प्रभाव नष्ट झाल्यानंतर त्या महिलांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्याने एका महिलेचा मृत्यू झाल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांनी नियुक्त केलेल्या चौकशी समितीने चौकशी केली आहे.

(३) संबंधीत वैद्यकीय अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय, चांदवड व वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय, मनमाड यांना जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांचेकडून दिनांक २.१२.२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात पीसीपीएनडीटी कायद्याअंतर्गत ७४ सोनोग्राफी केंद्रांनी नोंदणी न केल्याबाबत

**(५५) * ९५३०९ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), डॉ.संजय**

**रायमुलकर (मेहकर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पीसीपीएनडीटी कायद्याअंतर्गत सोनोग्राफी केंद्रांना नोंदणी करणे बंधनकारक असताना ७४ सोनोग्राफी केंद्रांनी नोंदणीच केली नसल्याची बाब दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदरहू सोनोग्राफी केंद्रांवर कारवाई करून केंद्र बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

दि.२२ सप्टेंबर २०१७ अखेर एकूण ७६ सोनोग्राफी केंद्रांनी नोंदणी केली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(२) होय.

(३) दि.२२ सप्टेंबर २०१७ पर्यंतच्या कालावधीतील नोंदणी नसलेल्या ७६ केंद्रांविरुध्द मा.न्यायालयामध्ये प्रकरणे दाखल करण्यात आलेली आहेत. त्यापैकी ४९ प्रकरणांचा निकाल लागलेला असून त्यापैकी २० जणांना शिक्षा झालेली आहे आणि २७ प्रकरणे प्रलंबित आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घिसर (ता.वेल्हे, जि.पुणे) येथील कानंदी नदीवर पूल बांधण्याबाबत

**(५६) * ९७९६२ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घिसर (ता.वेल्हे, जि.पुणे) येथील शाळेतील कचरेवस्ती, हिवरेवस्ती येथील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी कानंदी नदीच्या तात्पुरत्या बांबूच्या सहाय्याने बांधलेल्या लाकडी पुलावरुन दररोज धोकादायक प्रवास करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुसार सदर शाळेतील विद्यार्थ्यांची सुरक्षा विचारात घेऊन येथे पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषदेमार्फत प्रश्नांकित पुलाची पाहणी करण्यात आली असून घिसर येथील कचरेवस्ती, हिवरेवस्ती या अंदाजे १०० ते १५० लोकसंख्या असलेल्या वस्त्यांना जोडणारा रस्ता हा २.५० कि.मी. लांबीचा कच्चा मुरुमी रस्ता असून तो रस्ते विकास योजनेअंतर्गत समाविष्ट नाही. सदर रस्त्यावर सा.क्र. १/०० मध्ये कानंदी नदीवर लाकडी साकव असून तो नव्याने बांधण्याची गरज आहे.

(३) योजनाबाह्य रस्त्यावर प्रश्नांकित साकव असल्याने त्याचे काम जिल्हा परिषदेला करणे शक्य नाही. तथापि सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत जिल्हा नियोजन समितीअंतर्गत साकव बांधणे कार्यक्रमांतर्गत सदरचे काम करता येणे शक्य असल्याने सदरचे काम घेण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास जिल्हा परिषदेमार्फत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हयातील चांदूर रेल्वे येथील रायगड रीवर प्रोजेक्ट आणि दर्यापूर येथील वाघाडी सिंचन प्रकल्पाच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(५७) * ९६१३९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील चांदूर रेल्वे येथील रायगड रीवर प्रोजेक्ट आणि दर्यापूर येथील वाघाडी सिंचन प्रकल्पाच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असून सदर प्रकल्पांसाठी आगाऊ रक्कम दिलेली असतांनाही प्रकल्पांचे काम पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणांच्या गैरव्यवहाराची चौकशी पूर्ण झाली आहे काय, त्यानुसार दोषी अधिकारी, कंत्राटदार व संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

रायगड नदी प्रकल्प व वाघाडी सिंचन प्रकल्पाच्या कामात गैरव्यवहार झालेला नाही. तसेच सदर प्रकल्पामध्ये आगाऊ रक्कमही देण्यात आलेली नाही.

(२) नाही.

सदर प्रकल्पाचे तांत्रिक परिक्षण करण्यात आलेले असून निविदा बाबतची सर्व कार्यवाही ही शासनाच्या प्रचलित नियमानुसार झालेली आहे. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिना माढा उपसा सिंचन (ता.माढा, जि.सोलापूर) योजनेच्या उर्वरित भूसंपादन कामाबाबत

**(५८) * १०२७०६ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिना माढा (जि.सोलापूर) उपसा सिंचन योजना कार्यान्वित झालेली असून सदर योजनेच्या उर्वरित राहिलेल्या कामासाठी संयुक्त मोजणी झालेली नसल्यामुळे संपूर्णपणे भूसंपादन प्रक्रिया अद्यापपर्यंत झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या भूसंपादन कामासाठी संयुक्त मोजणी करिता भूमिअभिलेख व जलसंपदा विभागातील अपुऱ्या कर्मचाऱ्या अभावी कामे बंद असल्यामुळे भूसंपादनाची कार्यवाही तातडीने करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय तदनुसार सदरहू योजनेची भूसंपादन कामे विहीत कालावधीमध्ये पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) यासंदर्भात मा.मंत्री, जलसंपदा यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०४.१०.२०१७ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत मा. मंत्री महोदयांनी सदर कामे विहित कालावधीत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने खाजगी वाटाघाटीने व थेट खरेदीने भूसंपादन प्रक्रियेची कार्यवाही सूरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेची उद्दिष्टे अपूर्ण असल्याबाबत

**(५९) * ९६९०९ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भटक्या विमुक्त समाजाच्या आर्थिक स्तर उंचाविण्याकरीता दरवर्षी निधीची तरतुद करूनही यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेची उद्दिष्टे अपूर्ण असल्याबाबतची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समाजासाठी शासनाकडून विविध योजना राबविण्यात येत असून त्याकरीता दरवर्षी अर्थसंकल्पामध्ये ५ ते १० कोटीच्या निधीची तरतुद करण्यात येते परंतु मागील सहा वर्षात निधीची तरतुद करूनही समाज कल्याण विभागाबरोबरच वन, महसूल, गृहनिर्माण, ग्रामविकास, नियोजन आणि वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे उद्दिष्टे अपूर्ण राहिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, योजनेची उद्दिष्टे गाठण्याकरीता जिल्हा स्तरावर समिती गठीत करावयाची असतांना काही जिल्हयात समिती गठीत झाली नसून तर काही जिल्हयात साधे सर्वेक्षण सुध्दा झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार योजनेकरीता दरवर्षी निधीची तरतुद करूनही उद्दिष्टे पूर्ण करण्यास दुर्लक्ष करणाऱ्या विविध विभागाच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) ते (५) सदरहू योजना सन २०१२-१३ पासून राबविण्यात येत आहे. तथापि, सदरहू योजनेस अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्याने सदर योजनेमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

----------------

## कोल्हापूर जिल्हयाकरीता १४ व्या वित्त आयोगामधून देण्यात आलेला निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(६०) * १००९९६ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयाकरीता १४ व्या वित्त आयोगामधून देण्यात आलेल्या १०८ कोटी निधीपैकी अद्यापही ६६ कोटी रुपयांचा निधी खर्च झाला नसल्याची बाब दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास,चौकशीनुसार निधी वेळेत खर्च करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय. आराखडयातील कामे/प्रकल्प/उपक्रमांचे अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक अधिकाऱ्यांची मान्यता घेणे व ग्राम पंचायतीने प्रकल्प निहाय स्वतंत्र प्रशासकीय मान्यता देऊन कामे हाती घेण्यास विलंब झाला आहे.

(३) दरमहा आढावा बैठकीत संबधित गट विकास अधिकाऱ्यांना मार्च, २०१८ पर्यंत उर्वरित निधी खर्च करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे ब्रम्हनाळ (ता.पलूस, जि.सांगली) येथे मनरेगा योजनेच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार

**(६१) * १०१४२८ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ब्रम्हनाळ (ता.पलूस, जि.सांगली) येथे मनरेगा योजनेच्या कामामध्ये कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, या चौकशीनुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) अंशतः खरे आहे.

(२) ग्रामपंचायत ब्रम्हनाळ, ता.पलूस, जि.सांगली येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील कामांमध्ये अनियमितता झाल्याचे गट विकास अधिकारी, पलूस तसेच उप विभागीय अधिकारी, कडेगाव यांचेमार्फत चौकशी केली असता दिसून आले आहे. यामध्ये ग्रामसेवक, ग्रामरोजगार सेवक, सरपंच प्रथमदर्शनी दोषी आढळून येत आहेत.

सदर अहवालावरून मनरेगा अंतर्गत मस्टरवर दि.१३/०६/२०१६ ते २४/०७/२०१७ या कालावधीत मयत व्यक्तीच्या नावे हजेरी दाखवून रक्कम रु.६,७२०/- चे देयक मयत व्यक्तीच्या खात्यावर वर्ग केलेले आहे. तसेच दि.१५/०५/२०१६ ते २८/०५/२०१७ या कालावधीतील मस्टरवर एका महिलेचा दि.२०/०५/२०१७ रोजी विवाह असताना सदर कालावधीत तिची उपस्थिती हजेरीपत्रकावर दाखवून रु.२,३०४/- एवढा निधी वर्ग करणेत आलेला आहे. अशा प्रकारे संबंधित ग्रामरोजगार सेवक व ग्रामसेवक यांनी मस्टरवर खोटी उपस्थिती दाखवून एकूण रु.९,०२४/- चा गैरव्यवहार केलेला आहे.

(३) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पलूस यांच्या चौकशी अहवालानुसार मयत व्यक्तीच्या नावे खोटी हजेरी दाखवून शासकीय निधीचा अपहार केलेबाबत ग्रामरोजगार सेवक, ग्रामसेविका व तत्कालीन सरपंच हे जबाबदार आहेत.

या प्रकरणी संबंधित जबाबदार ग्रामरोजगार सेवक यांना कामावरून कमी करण्याचा विषय दि. १८ डिसेंबर, २०१७ ला होणाऱ्या ग्रामसभेत ठेवण्यात आला आहे. तसेच संबंधित ग्रामसेविकेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरणातील अपहारित रु. ९,०२४/- इतकी रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे. तत्कालीन सरपंच यांचा कालावधी संपुष्टात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) येथील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांकडून एमआयडीसीची थकबाकी वसूल करण्याबाबत

**(६२) * ९८७९० श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण (जि.रायगड) येथील विविध स्थानिक स्वराज्य संस्था व ग्रामपंचायतींकडे एमआयडीसीची कोट्यवधी रूपयांची पाणीपट्टी थकीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार विविध स्थानिक स्वराज्य संस्था व ग्रामपंचायतींकडून एमआयडीसीची थकबाकी वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) उरण गटात औद्योगिक वसाहती येत नाहीत. उरण गटातील एकूण ३५ ग्रामपंचायतीपैकी २३ ग्रामपंचायतीना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेमार्फत पिण्याचे पाण्याचा पुरवठा केला जात आहे.

माहे एप्रिल, २०१७ अखेर सदर ग्रामपंचायतीकडील थकबाकी विलंब आकार यासह एकूण रू. १९३१.७६ लाख इतकी असल्याचे दिसून येते. माहे ऑक्टोबर, २०१७ अखेर पाणीपट्टी थकबाकीपोटी सदर २३ ग्रामपंचायतीकडून रू.२१.६७ लाख रकमेचा भरणा करण्यात आला आहे.

गट विकास अधिकारी पंचायत समिती उरण यांनी दिनांक २८/१०/२०१६, १४/७/२०१७, ८/८/२०१७ व २८/११/२०१७ च्या पत्रान्वये ग्रामपंचायतीला पाणीपट्टीची रक्कम भरणा करण्याबाबत कळविलेले असून एमआयडीसीची पाणीपट्टी वसूलीबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) पाणी पट्टी वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

# अहमदनगर जिल्हयातील १७ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतींची झालेली दुरवस्था

**(६३) * ९७४६३ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील १७ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती मोडकळीस आल्या असून २४ उपकेंद्र इमारतीविनाच आहेत तसेच कुकाणा (ता.नेवासा) प्राथमिक आरोग्य केंद्रालाही इमारत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मोडकळीस आलेल्या इमारतींबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अहवाल पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतींच्या दुरुस्तीबाबत व २४ उपकेंद्राला इमारती उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

अहमदनगर जिल्हयातील १७ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत.

तसेच २० उपकेंद्रांच्या ठिकाणी जागे अभावी इमारत बांधकाम हाती घेता येत नाही.

मौजे कुकाणा, ता.नेवासा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत असून, सदर इमारतीत प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित आहे.

(२) व (३) मोडकळीस आलेल्या १७ प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी ७ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या निर्लेखनास जिल्हा परिषदेने मान्यता दिली असून, यापैकी ३ प्रा.आ. केंद्राची पुर्नबांधणी करण्यास जिल्हा परिषदेने दि.१३.११.२०१७ रोजी मंजूरी दिलेली आहे.

हिरवेकोर्डा, ता.पारनेर व लोणीमसदपूर, ता.कर्जत या दोन ठिकाणी जागा उपलब्ध झालेली असून उपकेंद्र इमारतीचे बांधकाम हाती घेण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत सुरु आहे.

२० उपकेंद्राच्या ठिकाणी जागा उपलब्धतेबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आष्टी (ता.भातकुली, जि.अमरावती) येथील अंगणवाडी बांधकामात झालेली अनियमितता

**(६४) * ९६७६८ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी (ता.भातकुली, जि.अमरावती) येथे ४ अंगणवाडी केंद्र असून या चारही अंगणवाडी केंद्राच्या बांधकामासाठी २२ लाखांचा निधी राज्य शासनाकडून मंजूर असून सन २०१२-२०१३ च्या सुमारास बांधकामाल सुरुवात करण्यात आली परंतु सदरचे बांधकाम अर्धवट करण्यात आल्याचे दिनांक ३० ऑगस्ट २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंगणवाड्यांचे बांधकाम अपूर्ण असल्यामुळे अंगणवाडी खाजगी जागेत भरविल्या जात असून, अंगणवाडी बांधकामात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे गावातील ग्रामस्थांनी लेखी तक्रार जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार अंगणवाडयांचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत व गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) आष्टी येथील ४ अंगणवाडी बांधकामासाठी रु.१८.०० लक्ष निधी वितरीत केलेला होता. ४ अंगणवाडी बांधकामापैकी एका अंगणवाडीचे सज्जापर्यंत बांधकाम झाले आहे व ३ अंगणवाडयांची किरकोळ कामे बाकी आहेत.

(२) होय.

(३) होय.

(४) तत्कालीन ग्रामसेवक आष्टी पंचायत समिती भातकुली यांचेवर मुल्यांकनापेक्षा जादा खर्चाची रक्कम रुपये ३,६३,९३७/- वसुल करण्याचे आदेश पारित झालेले आहेत.

(५) कार्यवाहीचे आदेश पारित झाले असल्यामुळे सदर प्रकरणी कार्यवाहीस विलंब झालेला नाही.

-----------------

## राज्यात जन-धन योजनेत दहा लाख शेतकऱ्यांची बँक खाती बनावट असल्याबाबत

**(६५) * ९८९५४ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जन-धन योजनेत दहा लाख शेतक-यांची बँक खाती ही बनावट असून यासाठी राष्ट्रीयकृत बँक कारणीभूत असल्याचे मा.महसूल मंत्री यांनी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीयकृत बँकांनी शेतक-यांना मोठया प्रमाणात खातेदार बनविले असून त्यातील हजारो शेतकरी हे यापूर्वीच सहकारी बँकांचे खातेदार असल्यामुळे कर्जमाफीचा विचार करताना अनेक नावांची पुनरावृती होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १० लाख बनावट बँक खाती नेमकी कोणत्या बँकामधील असून त्यात किती रक्कमा आहेत यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही,
(२), (३) व (४) राष्ट्रीयकृत बँकांमध्ये जन-धन खाती उघडणे व तत्सम बाबी सर्वस्वी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या अखत्यारित येतात. त्यामुळे याबाबतची कोणतीही माहिती राज्य शासनाकडे नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या हजगर्जीपणामुळे सहा जणांचा झालेला मृत्यू

**(६६) * ९७२८७ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी यांनी दुषित पाणी तपासणी न केल्यामुळे हिरापूर (जि.हिंगोली) येथील नागरिकांना मुत्रपिंडांचा आजार होऊन सहा जणांचा मृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोटारी गट ग्रामपंचायत अंतर्गत हिरापूर या आदिवासी लोकांच्या वस्तीत अनेक लोकांना वेगवेगळया रोगांची लागण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोंषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :**
(१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६७) * ९८६१६ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राना नियमित औषधांचा पुरेसा पुरवठा, अत्याधुनिक स्वरुपाची यंत्रसामुग्री, इतर आवश्यक असलेली वैद्यकीय उपकरणे तसेच वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी त्वरित उपलब्ध करुन देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याअनुषंगाने आंबेगाव तालुक्यातील आरोग्य केंद्रांना अत्यावश्यक वैद्यकीय सोयीसुविधा व वैद्यकीय अधिकारी / कर्मचारी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय हे खरे आहे.

(२) आंबेगाव तालुक्यातील ७ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ४८ उपकेंद्रे, ३ आयुर्वेदिक दवाखाने व ३ प्राथमिक आरोग्य पथके येथील आरोग्य संस्थांमध्ये प्राथमिक स्वरुपाची तपासणी करण्यासाठी आवश्यक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध आहेत. तसेच आरोग्य केंद्रामध्ये अत्यावश्यक औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

वैद्यकीय अधिकारी गट-अ यांच्या पदभरतीबाबत माहे डिसेंबर,२०१७ च्या पहिल्या आठवडयात समुदेशनाद्वारे भरतीप्रक्रिया राबविण्यात आली असून राज्यासाठी एकूण ३१९ वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्ती देण्यात आल्या आहेत. त्यापैकी प्राथमिक आरोग्य केंद्र, पेठ, ता.आंबेगाव, जि.पुणे येथे वैद्यकीय अधिकाऱ्यास नियुक्ती देण्यात आली आहे.

वर्ग-३ ची पदे जिल्हा परिषदेच्या अखत्यारित असून जिल्हा परिषदेकडून वेळोवेळी पदभरतीची कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्हयातील बाघ नदीवर पुजारीटोला प्रकल्पात केवळ १६ दलघमी पाणी साठा असल्याबाबत

**(६८) * १०३६३७ श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयापासून ८० कि.मी. अंतरावर असलेल्या बाघ नदीवर पुजारीटोला प्रकल्पात केवळ १६ दलघमी पाणी साठा उपलब्ध असल्याने या जिल्हयात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली असल्याचे दिनांक २८ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची गैरसोय होत असूनही संबंधित प्रशासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी पाणी पुरवठा करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

बाघ प्रकल्पा अंतर्गत सिरपूर, पुजारीटोला व कालीसरार ही तीन धरणे असून दिनाक २८.१०.२०१७ चा पाणीसाठा खालील प्रमाणे आहे.

१. सिरपूर-२४.८४ दलघमी (१५.५५ %)

२. कालीसरार-१०.७१ दलघमी (४१.१० %)

३. पुजारीटोला-१०.५८ दलघमी (२४.३१ %)

एकूण-४३.१३ दलघमी (१६.७१ %)

(२) नाही.

(३) जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी संभाव्य टंचाई काळाकरीता सिरपूर जलाशयात १.०० दलघमी व पुजारीटोला जलाशयात ११.५० दलघमी असे एकूण १२.५० दलघमी पिण्याकरीता पाणी आरक्षित केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हयात डेंग्यू तपासणी केंद्राची निर्मिती करण्याबाबत

**(६९) * ९९५२७ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात डेंग्यू तपासणी केंद्र (लॅब) नसल्यामुळे येथे डेंग्यू तपासणी केंद्राची निर्मिती करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यापूर्वीही वारंवार निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने अमरावती जिल्हयात डेंग्यू तपासणी केंद्राची निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

(२) जिल्हा सामान्य रुग्णालयामार्फत विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती येथे डेंग्यू तपासणी केंद्राची निर्मिती करणेबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(३) लागू नाही.

----------------

## सांगली जिल्हयातील टेंभू जल उपसासिंचन योजनेच्या पंपगृहाची आणि वीज उपकेंद्राची कामे पूर्ण करण्याबाबत

**(७०) * ९७०७९ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील टेंभू जल उपसासिंचन योजनेच्या टप्पा क्रमांक ४ आणि ५ च्या पंपगृहाची आणि वीज उपकेंद्राची तसेच उर्वरीत सर्व कामे तातडीने पूर्ण करावीत अशी मागणी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे खानापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार टेंभू जल उपसासिंचन योजनेच्या टप्पा क्रमांक ४ आणि ५ च्या पंपगृहाची आणि वीज उपकेंद्राची व उर्वरीत कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतल्या वाडिया रुग्णालयात एनआयसीयूसाठी मंजूर केलेला निधी नियमित मिळण्याबाबत

**(७१) * ९५३४६ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वाडिया बाल रुग्णालयात आशियातील सर्वात मोठा अतिदक्षता विभाग (एनआयसीयू) असून या बाल रुग्णालयात अत्यवस्थ बालकांवर उपचार करण्यात येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयाला एनआयसीयूसाठी निधी देण्याचे आदेश मा.न्यायालयाने सन २०१४ मध्ये दिले असतानाही एनआयसीयूसाठी मंजूर केलेला निधी शासनाकडून नियमित मिळत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयास नियमित निधी न मिळण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या रुग्णालयाला नियमित निधी मिळण्याबाबत व येथे आणखी अतिदक्षता विभागात एनआयसीयू उभारण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) वाडिया बालरुग्णालयात बालकांवर उपचार करण्यात येतात, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

जनहित याचिका क्र. ७/२०१४ च्या संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.२५.८.२०१५ च्या आदेशान्वये बाई जेरबाई वाडिया बालरुग्णालयास शासनाकडून निधी देय असल्यास तो उपलब्ध करुन द्यावा, असे नमूद केले आहे.

बाई जेरबाई वाडिया बाल रुग्णालयाला अनुदान देण्याबाबत कोणताही विश्वस्त करार सदर रुग्णालय, ट्रस्ट व महाराष्ट्र शासन यांच्या दरम्यान झालेला नाही.

बाई जेरबाई वाडिया बाल रुग्णालयास शासनाकडून कोणताही निधी दिला जात नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येरड बाजार (ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती) येथील शेतजमिनीमध्ये प्रकल्पाचे पाणी जावून पिकांचे झालेले नुकसान

**(७२) * ९६८२३ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदूर रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील येरड बाजार या बेंबळा प्रकल्पाअंतर्गत पुनर्वसीत गावातील शेतकऱ्यांच्या प्रकल्पा क्षेत्रामध्ये न

गेलेल्या शेतजमिनीमध्ये माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान प्रकल्पाचे पाणी जावून सोयाबीन व तुर या पिकांचे मोठ्या प्रामाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान भरपाई मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी अधिक्षक अभियंता, यवतमाळ, पाटबंधारे विभाग आणि जिल्हाधिकारी अमरावती यांना लेखी कळविल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिकांची नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) पिक बाधीत क्षेत्राचे गावनिहाय/गटनिहाय संयुक्त पाहणी व पंचनामे करून पिक बाधीत क्षेत्राचा प्रस्ताव यवतमाळ व अमरावती जिल्हयांचे कृषी खात्यांकडे मूल्यांकनासाठी सादर करण्यात आला. यवतमाळ व अमरावती जिल्हांचे कृषी खात्याकडून पिकांचा मूल्यांकन अहवाल प्राप्त झाला असून मंजुरीस्तव कार्यवाहीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.